सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ०२ एप्रिल २०२५ | वर्ष तिसरे | अंक ०१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भाजपाचे सर्व खासदार हजर व्हा, वक्फ विधेयकासाठी व्हिप जारी




नवी दिल्ली : लोकसभेत वक्फ विधेयक बुधवार २ एप्रिल रोजी सादर होणार आहे. हे विधेयक चर्चेअंती विना अडथळा मंजूर व्हावे यासाठी सत्ताधारी भाजपाचे प्रयत्न सुरू आहेत. भाजपाने लोकसभेतील पक्षाच्या सर्व सदस्यांना तीन ओळींचा व्हिप बजावला आहे. या व्हिपद्वारे भाजपाच्या लोकसभेतील सर्व खासदारांना बुधवार २ एप्रिल रोजी दिवसभर कामकाजासाठी हजर राहण्याचे तसेच मतदानावेळी पक्षाच्या अधिकृत भूमिकेचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याआधी संसदीय कामकाज आणि अल्पसंख्यांक कल्याण मंत्री किरेन रिजिजू यांनी ८ ऑगस्ट २०२४ रोजी वक्फ विधेयक लोकसभेत सादर केले होते. त्यावेळी विधेयक लोकसभेतून एकमताने संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा निर्णय झाला होता. यानंतर जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त संसदीय समिती स्थापन करण्यात आली. या समितीने केलेल्या शिफारशी आणि सूचनांच्याआधारे वक्फ विधेयकाचा सुधारित मसुदा लोकसभेत सादर होणार आहे.

भाजपाने व्हिप काढला आहे. रालोआतील इतर घटक पक्षांकडूनही व्हिप काढले जाण्याची शक्यता आहे. तेलगू देसम पक्षाने विधेयकाचे समर्थन करणार असल्याचे जाहीर केले आहे. लोकसभेत सध्या ५४२ खासदार आहेत. यात भाजपाचे २४० खासदार आहेत. भाजपाच्या नेतृत्वातील एनडीए अर्थात रालोआचे एकूण खासदार २९३ आहेत. विधेयक मंजूर करण्यासाठी २७२ जणांच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे. यामुळे लोकसभेत रालोआची बाजू भक्कम दिसत आहे. लोकसभेत काँग्रेसचे ९९ खासदार आहेत. इंडी आघाडीचे एकूण खासदार २३३ आहेत. या व्यतिरिक्त काही लहान पक्षांचे खासदार आणि निवडक अपक्ष खासदार आहेत. पण या मंडळींनी वक्फ विधेयकाला विरोध करणार की पाठिंबा देणार हे जाहीर केलेले नाही. ही आकडेवारी बघता लोकसभेत विरोधकांची बाजू कमकुवत आहे.

लोकसभेत मंजूर झाले तर वक्फ विधेयक लवकरच राज्यसभेत सादर केले जाण्याची शक्यता आहे. राज्यसभेत सध्या २३६ खासदार आहेत. यात भाजपाचे ९८ खासदार आहेत. भाजपाच्या नेतृत्वातील एनडीए अर्थात रालोआचे एकूण खासदार ११५ आहेत. सहा नामनिर्देशित खासदार सरकारच्या बाजूने मतदान करण्याची शक्यता गृहित धरली तर विधेयकाला १२१ जणांचा पाठिंबा मिळेल. विधेयक मंजूर करण्यासाठी ११९ जणांच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे. यामुळे राज्यसभेतही रालोआची बाजू विरोधकांच्या तुलनेत वरचढ दिसत आहे. राज्यसभेमध्ये काँग्रेसचे २७ आणि इंडी आघाडीचे एकूण खासदार ५८ आहेत. या व्यतिरिक्त काही लहान पक्षांचे खासदार आणि निवडक अपक्ष खासदार आहेत. पण या मंडळींनी वक्फ विधेयकाला विरोध करणार की पाठिंबा देणार हे जाहीर केलेले नाही.यात वायएसआर काँग्रेसचे नऊ, बिजू जनता दलाचे सात, अण्णाद्रमुकचे चार तसेच इतर तीन खासदार आहेत.

## आता ई-बाइक टॅक्सी राज्यात धावणार

मुंबई : राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ई-बाईक टॅक्सीला अधिकृत परवानगी देण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, पेट्रोलवर चालणाऱ्या बाईक टॅक्सींना परवानगी दिली जाणार नाही, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. सह्याद्री अतिथीगृहात मंगळवारी (१ एप्रिल) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

राज्यात बाईक टॅक्सी सुरू होणार असल्याच्या चर्चा गेल्या काही महिन्यांपासून सुरू होत्या. अखेर या निर्णयाला हिरवा झेंडा मिळाल्याने आता लवकरच ई-बाईक टॅक्सी सेवा सुरू होणार आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना प्रताप सरनाईक यांनी यासंबंधी अधिक माहिती दिली.

माध्यमांशी संवाद साधताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत बाईक टॅक्सीच्या मान्यतेचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर मांडण्यात आला होता. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या नेतृत्वात झालेल्या आजच्या बैठकीमध्ये संपूर्ण महाराष्ट्रामध्ये बाईक टॅक्सीला परवानगी दिली आहे. एका प्रवाशाला जी गैरसोय होत होती, रिक्षा किंवा टॅक्सीसाठी तिप्पट भाडे द्यावे लागणार होते. त्यांचे हे कष्ट वाचणार असून पैशांची बचत होणार आहे. असे ते म्हणाले.

महाराष्ट्रभर ई-बाईक टॅक्सीला परवानगी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. त्यासाठी १५ किमी अंतराची मर्यादा ठेवण्यात आली आहे. ५० बाईक एकत्रपणे घेणाऱ्या संस्थेला अशा प्रवासी वाहतुकीची परवानगी दिली जाणार आहे.

## डिजीटल व्यवहारांत जागतिक नेतृत्व मिळवून देण्यात आरबीआयचा महत्वाचा वाटा - राष्ट्रपती मुर्मू

मुंबई : भारतीय रिझर्व्ह बँकेने गेल्या काही वर्षांत नाबार्ड, आयडीबीआय, नॅशनल हाऊसिंग बँक सारख्या संस्थांची स्थापन करून आर्थिक परिसंस्था मजबूत केली. आरबीआयने शेती, लघू व्यवसाय आणि गृहनिर्माण क्षेत्रालाही आवश्यक आधार दिला. भारताला डिजिटल व्यवहारांमध्ये जागतिक नेतृत्व मिळवून देण्यात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा मोठा वाटा आहे. मजबूत बँकिंग प्रणाली, वित्तीय नवउपक्रम आणि ग्राहकांचा विश्वास कायम राखण्याच्या दृष्टीने याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असेल असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले. मुंबईच्या एनसीपीए नरिमन पॉईंट येथे आयोजित रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ९०व्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमात राष्ट्रपती मुर्मू बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा उपस्थित होते.

याप्रसंगी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ९०व्या वर्धापन दिनाचा उत्सव आज साजरा करत आहोत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया या प्रतिष्ठित संस्थेच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर ही देशातील सर्वात महत्त्वाच्या संस्थांपैकी एक आहे. देशाची केंद्रीय बँक म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया भारताच्या अद्वितीय विकास प्रवासाच्या केंद्रस्थानी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील खडतर स्थितीपासून ते आजच्या जागतिक महासत्तेपर्यंतच्या प्रवासात आरबीआय हा महत्त्वाचा आधारस्तंभ राहिला आहे.

## सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टकडून मुलींना मिळणार १० हजार रुपये!

### 'श्री सिद्धिविनायक भाग्यलक्ष्मी योजना'

मुंबई : राज्य सरकार महाराष्ट्रातील महिला वर्गासाठी सातत्याने नवनवीन योजना सादर करत असते. महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने महिलांसाठी 'लाडकी बहिण योजना' सुरु केली आहे. याद्वारे राज्यातील लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जात आहेत. त्याचबरोबर सरकारच्यावतीने स्त्री जन्माचे स्वागत करण्यासाठी माझी कन्या भाग्यश्री योजना राबविण्यात येत असून पहिल्या मुलीवरच समाधान मानणाऱ्या पालकांना ५० हजार रुपयांचे अनुदान शासनातर्फे देण्यात येत आहे. तसेच शिक्षणार्थी मुलींसाठी देखील सरकारने योजना सुरु केल्या आहेत. यातच आता



सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टतर्फे 'श्री सिद्धिविनायक भाग्यलक्ष्मी योजना' राबविण्यात येत आहे. यातून मुलींना १० हजार रुपये मिळणार आहेत.

सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टच्या र्फे श्री सिद्धिविनायक भाग्यलक्ष्मी योजना राबविण्यात येत आहे. न्यास व्यवस्थापन समितीने याला मान्यता दिली आहे. मुलींच्या जन्मास प्रोत्साहन देणे, त्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत करणे, मुलींच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या स्तरावरून लेक वाचवा, लेकीला शिकवा या स्वरूपाचा धोरणाला श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाचाही हातभार लागावा या हेतुने ही योजना सुरु करण्यात येणार आहे. या योजनेतून महाराष्ट्रातील शासकीय रूग्णालयात जन्मास आलेल्या बालिकांच्या नावाने १० हजार रुपयांचे फिक्स डिपॉझिट स्वरूपात त्यांच्या मातेच्या खात्यावर ठेवण्याबाबतची योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.

८ मार्च रोजी जन्म झालेल्या बालिकांना मिळणार योजनेचा लाभ

या संकल्पात महाराष्ट्रातील शासकीय रूग्णालयात जागतिक महिला दिनी ८ मार्च रोजी जन्म झालेल्या नवजात बालिकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी श्रीसिध्दिविनायक भाग्यलक्ष्मी योजना राबविण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्याबाबत घोषणा न्यासाचे अध्यक्ष सदानंद सरवणकर यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

दरम्यान, याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे. त्यानंतर या योजनेसाठीचे निकष लवकरच जाहीर करण्यात येतील, अशी माहिती सिद्धीविनायक ट्रस्टकडून देण्यात आली आहे.

सिद्धीविनायक ट्रस्टचे अध्यक्ष सदा सरवणकर यांनी सांगितले की, सिद्धीविनायक न्यायाच्या उत्पन्नात भरघोस वाढ झाली आहे. सरत्या आर्थिक वर्षात ट्रस्टला १३३ कोटींचे उत्पन्न मिळाले. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत १५ टक्क्यांनी उत्पन्नात वाढ झाली असल्याचे सरवणकर यांनी सांगितले. सन २०२४-२५ साठी न्यासाचे अपेक्षित उत्पन्न ११४ कोटी रुपये इतके धरण्यात आले होते. आशिर्वचन पूजा देणगी, लाडू व नारळवडी यासंदर्भात विश्वस्त व प्रशासन यांच्या नियोजनामुळे उत्पन्न रू ११४ कोटीवरून रू १३३ कोटीच्या घरात गेले आहे, ही प्रशंसनीय बाब आहे. सन २०२५-२६ या पुढील वर्षासाठी न्यासाचे अपेक्षित उत्पन्न रू १५४ कोटी इतके गृहीत धरण्यात येत आहे.

## जनसुरक्षा कायद्यास विरोध : ३ एप्रिल रोजी पत्रकारांची मुंबईत निदर्शने

मुंबई : अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध आणणाऱ्या प्रस्तावित विशेष जनसुरक्षा विधेयकास एकजुटीने विरोध दर्शवण्यासाठी ३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी एक वाजता मुंबईतील पत्रकार मुंबई मराठी पत्रकार संघाच्या परिसरात तीव्र निदर्शने करणार आहेत. मुंबईतील १० प्रमुख पत्रकार संघटनांनी एकत्र येत स्थापन केलेल्या पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचाच्यावतीने दुपारी १ वाजता हे आंदोलन होत असल्याची माहिती पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचाच्या प्रसिध्दी पत्रकात देण्यात आली आहे.

जनसुरक्षेच्या गोंडस नावाखाली राज्य सरकार लोकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरच आक्रमण करू पहात आहे. या कायद्याचा फटका पत्रकार आणि प्रसार माध्यमांना सर्वाधिक बसणार आहे. त्यामुळे पत्रकारांनी पुढाकार घेत कायद्याला ठामपणे विरोध करण्याचा भूमिका घेतली आहे. मुंबईतील दहा प्रमुख पत्रकार संघटनांची एक बैठक नुकतीच मुंबई मराठी पत्रकार संघात पार पडली. या बैठकीत पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंच स्थापन करून या व्यासपीठाच्या माध्यमातून कायद्याला विरोध करणारी चळवळ सुरू करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. त्यानुसार मंचाच्यावतीने लवकरच राज्यपाल, मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन पत्रकारांच्या तीव्र भावना त्यांच्याकडे व्यक्त करण्यात येणार आहेत.

तसेच तुषार खरात आणि राज्यातील अन्य पत्रकारांवर खोटे गुन्हे दाखल करून पत्रकारांची मुस्कटदाबी करण्यात येत असल्याची बाब देखील राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देत तुषार खरात व इतर पत्रकारांवरील गुन्हे रद्द करण्याची मागणी केली जाणार आहे. विविध पक्षांच्या प्रमुखांनाही भेटून त्यांनी जनसुरक्षा कायद्यास विरोध करणारी भूमिका घ्यावी अशी त्यांना विनंती केली जाणार आहे.

३ एप्रिलच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्यभरही पत्रकार रस्त्यावर उतरतील, त्याची तारीखही लवकरच जाहीर करण्यात येईल, असा इशाराही मंचाच्यावतीने एस.एम.देशमुख, संदीप चव्हाण यांनी दिला आहे. ३ एप्रिलच्या आंदोलनात मुंबईतील जास्तीत जास्त पत्रकारांनी सहभागी व्हावे,असे आवाहन मंचाच्यावतीने करण्यात आले आहे.

## देशाच्या १४ राज्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा

मुंबई : हवामान खात्याने मंगळवारी मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि गुजरातसह १४ राज्यांमध्ये पाऊस आणि वादळाचा अंदाज वर्तवला आहे. मध्य प्रदेशसह तीन राज्यांमध्ये गारपीट होण्याची शक्यता आहे. याशिवाय, आयएमडीने यावर्षी तीव्र उष्णतेचा इशारा दिला आहे.

यावर्षी एप्रिल ते जून दरम्यान देशाच्या अनेक भागांमध्ये तापमान सामान्यपेक्षा जास्त राहील, असे हवामान विभागाने सूचित केले आहे. किमान तापमानही सामान्यपेक्षा जास्त राहण्याची अपेक्षा आहे.आयएमडीने सोमवारी राजस्थान, गुजरात, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, छत्तीसगड, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि उत्तर कर्नाटक आणि तामिळनाडूमध्ये एप्रिल-जूनमध्ये उष्णतेच्या लाटेच्या दिवसांमध्ये वाढ होण्याची शक्यता वर्तवली आहे.एप्रिलमध्ये गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, पूर्व उत्तर प्रदेश, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, छत्तीसगड, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि उत्तर कर्नाटकमध्ये उष्णतेच्या लाटा येण्याची शक्यताही विभागाने वर्तवली आहे.

यावर्षीच्या मान्सूनसाठी एल निनो परिस्थितीची शक्यता विभागाने नाकारली आहे. एल निनो हा एक हवामानाचा नमुना आहे ज्यामध्ये विषुववृत्तीय प्रशांत महासागरातील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान सामान्यपेक्षा जास्त गरम होते. यामुळे जगभरातील हवामान पद्धतींमध्ये बदल होतात.आयएमडीच्या आकडेवारीनुसार, ३१ मार्चपर्यंत देशभरात २०.१ मिमी पाऊस पडला आहे. १९०१ नंतरचा हा २७ वा सर्वात कमी पाऊस आहे आणि २००१ नंतरचा १० वा सर्वात कमी पाऊस आहे.

## फटाका कारखाना स्फोटात १८ जणांचा मृत्यू

बनासकांठा : गुजरातच्या बनासकांठा मधील डीसा इथल्या फटाक्याच्या कारखान्यात आज, मंगळवारी स्फोट झाल्याने भीषण आग लागली. या आगीत १८ कामगारांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि आगीवर नियंत्रण मिळवले.

एकामागून एक अनेक स्फोट होत असताना, गोदामाच्या अनेक भिंती कोसळल्या आणि कचरा दूरवर पसरला. या घटनेनंतर चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. माहितीनुसार, कारखान्यात कामगार फटाके बनवत असताना मोठा स्फोट झाला. यामुळे काही कामगारांचे



मृतदेह दूरवर पडले. या घटनेमुळे घबराट निर्माण झाली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे पथक घटनास्थळी पोहोचले. खूप प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात आली. कचरा हटवण्याचे कामही झाले आहे.

या अपघाताबाबत मिळालेल्या माहितीनुसार, डीसा येथील धुनवा रोडवर दीपक ट्रेडर्स नावाचा फटाक्यांचा कारखाना आहे. आज फटाके बनवत असताना अचानक स्फोटक पदार्थाचा स्फोट झाला, ज्यामुळे आग लागली. फटाक्यांचा कारखाना असल्याने, आगीने लवकरच भयानक रूप धारण केले.

घटनेच्या वेळी कारखान्यात किती कामगार उपस्थित होते याबद्दल सध्या कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नाही. आग पसरताच घटनेत गोंधळ उडाला. स्थानिक पोलिस आणि प्रशासकीय अधिकारीही घटनास्थळी पोहोचले आहेत आणि घटनेची चौकशी करत आहेत. सुरुवातीच्या अहवालांनुसार १८ कामगारांचे मृतदेह सापडले आहेत. सुमारे पाच कामगारांना उपचारासाठी डीसा येथे पाठवण्यात आले आहे. दिसाचे आमदार प्रवीण मणी, डीएसपी, दिसाचे उपजिल्हाधिकारी, मामलतदार आणि इतर प्रशासनिक अधिकारी घटनास्थळी लक्ष ठेवून आहेत.

डीसाचे आमदार प्रवीण माळी म्हणाले की, प्राथमिक माहितीनुसार बॉयलरच्या स्फोटामुळे हा अपघात झाला. ज्यामध्ये इमारत कोसळली आणि त्याखाली अनेक लोक गाडले गेले. त्यापैकी काही काढून टाकण्यात आले आहेत. पाच जणांना वाचवण्यात आले आहे आणि त्यांना रुग्णालयात नेण्यात आले आहे, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## सीआयआय पश्चिम विभाग तर्फे आर्थिक वाढ आणि औद्योगिक शाश्वततेचे व्हिजन जाहीर



छत्रपती संभाजीनगर : कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (CII) वेस्टर्न रिजनचे अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर ऋषी कुमार बागला यांनी प्रथमच प्रसार माध्यमांशी संवाद साधत सीआयआय पश्चिम विभाग तर्फे आर्थिक वाढ आणि औद्योगिक शाश्वततेचे व्हिजन जाहीर केले. देशाच्या औद्योगिक आणि आर्थिक परिदृश्याला बळकट करण्यासाठी संस्थेच्या वचनबद्धतेवर भर देत १३० वर्षांचा वारसा घेऊन, उज्ञ्श्र भारतातील व्यावसायिक वातावरण सुधारण्यासाठी, औद्योगिक वाढीसाठी संधी निर्माण करण्यासाठी आणि २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याच्या देशाच्या दीर्घकालीन दृष्टीला चालना देण्यासाठी वचनबद्ध असल्याचे सांगितले.

### दोन नवीन कौशल्य विकास केंद्रे स्थापन

**बागला यांनी घोषणा केली की सीआयआय लवकरच नागपूर, सुरत, वडोदरा आणि राजकोट येथे स्वतःची कार्यालये स्थापन करेल. उखख ची छत्रपती संभाजीनगर आणि पिथमपूर येथे दोन नवीन कौशल्य विकास केंद्रे स्थापन करण्याची योजना आहे. CII उद्योग-शैक्षणिक भागीदारी वाढवणे, कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करणे आणि उद्योजकता आणि नवोन्मेषाला प्रोत्साहन देणारे अनुकूल धोरण वातावरण निर्माण करण्यासाठी कार्य करणे सुरू ठेवणार असल्याचे सांगितले.**

स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप आणि पॉलिसी डव्होकसी द्वारे, व्यवसाय करण्याची किंमत आणि इलेक्ट्रिक वाहने (EVs), सेमीकंडक्टर आणि अक्षय ऊर्जा यांसारख्या उच्च-वाढीच्या क्षेत्रांमध्ये गुंतवणूकीला प्रोत्साहन देणे यासारख्या महत्त्वाच्या आव्हानांना तोंड देण्याचे आमचे ध्येय असून सीआयआय पश्चिम क्षेत्राचे आर्थिक महत्त्व अधोरेखित करून जे देशाच्या जीडीपी मध्ये २५% आणि देशाच्या व्यापारी मालाच्या निर्यातीत ४८% योगदान देते.

पेट्रोलियम, अभियांत्रिकी वस्तूंसारख्या उत्पादनांसह गुजरात आणि महाराष्ट्रासह या प्रदेशातील प्रमुख योगदानकर्ते भारताच्या निर्यात अर्थव्यवस्थेत मध्यवर्ती भूमिका बजावतात. फार्मास्युटिकल्स आणि रत्ने आघाडीवर आहेत.महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा, या राज्यांच्या औद्योगिक वाढीसाठी रोडमॅप्स तयार करणे यावर ही भर दिला जात असल्याचे म्हणाले.

## शेअर बाजार गडगडला

मुंबई : नवीन आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी भारतीय शेअर बाजार गडगडला. ट्रेडिंग सत्रात सेन्सेक्स १,४०० अंकांनी घसरला. त्यानंतर सेन्सेक्स १,३९० अंकांच्या घसरणीसह ७६,०२४ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक ३५३ अंकांनी घसरून २३,१६५ वर स्थिरावला. मुख्यत: आयटी आणि बँकिंग शेअर्सच्या घसरणीचा बाजारावर अधिक दबाव राहिला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प २ एप्रिल रोजी परस्पर शुल्क म्हणजे रेसिप्रोकल टॅरिफ लागू करणार असल्याच्या चिंतेने बाजाराला घेरले. यामुळे गुंतवणूकदार सावध झाले असून ऑटो वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांक घसरले.

## संजय शिरसाठ यांच्या प्रमुख उपस्थितीत आज संपन्न होणार हिंदूधर्मीय सामूहिक सोहळा

## नेत्र दिपक विवाह सोहळ्याचे साक्षीदार व्हा : व्यंकटेश शिंदे

परळी (प्रतिनिधी): शिवसेना आयोजित हिंदु धर्मिय सामुदायिक विवाह सोहळा महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री, छत्रपती संभाजी नगर चे पालक मंत्री तथा शिवसेनेचे प्रवक्ते ना. संजयजी सिरसाठ यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न होणार आहे. गरजवंत कुटुंबातील वधू वरांच्या नेत्रदीपक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी अन् शुभाशिर्वाद देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन शिवसेना आयोजित हिंदू धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजक तथा शिवसेना तालुका प्रमुख व्यंकटेश शिंदे यांनी केले आहे.

शिवसेनेच्या वतीने प्रती वर्षी हिंदु धर्मिय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. परळी तालुक्यातील शेतकरी, कामगार, कष्टकरी, ऊसतोड मजूर अशा गरजवंत कुटुंबातील मुलींचे सामुदायिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून कन्यादान करण्याचे पवित्र कार्य शिवसेनेच्या वतीने करण्यात येते. दिनांक २ एप्रिल बुधवार रोजी सायंकाळी ठीक ५ वाजता शिवशाहीर साईनाथ पाटील यांचा शिवचरित्रावर प्रकाश झोत टाकणारा पोवाडा सादर करण्यात येईल अन् ठीक ६ वाजता मोंढा मैदान मारोती मंदिर समोर दिमाखदार विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी परळी तालुक्यातील



राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी तथा मान्यवर, व्यापारीवर्ग, विविध सामाजिक क्षेत्रातील तसेच चळवळीतील विचारवंत, पत्रकार बांधव यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. शिवसेनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या हिंदू धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यासाठी परळी शहरातील नागरिकांनी या नेत्रदीपक सोहळ्यास उपस्थित राहून वधू वरांना शुभाशिर्वाद देऊन नेत्रदीपक सोहळ्याचे साक्षीदार व्हावे असे आवाहन विवाह सोहळ्याचे प्रमुख आयोजक तथा शिवसेना तालुका प्रमुख व्यंकटेश शिंदे यांनी केले आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सरपंच नागरगोजे यांच्यासह अनेकांचा भाजपत प्रवेश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** आमदार रमेश कराड यांच्या नेतृत्त्वावर विश्वास ठेऊन रेणापूर तालुक्यातील दवणगाव येथील सरपंच रवींद्र नागरगोजे यांच्यासह अनेकांनी लातूर येथील भाजपच्या संवाद कार्यालयात सोमवारी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

भाजपचे नेते आमदार रमेश कराड यांच्या माध्यमातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विविध गावात विशेषतः रेणापूर तालुक्यातील दवणगाव येथे विविध विकासकामांना मोठ्या प्रमाणात निधी मिळाला आहे, अनेक विकासकामांना गती मिळाली आहे.

शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या विविध योजनांचा गरजू आणि पात्र बहुसंख्य लाभार्थ्यांना लाभ मिळाला. दवणगाव येथे सध्या होत असलेली विकास कामे लक्षात घेऊन आणि भविष्यात या कामांना अधिक गती मिळावी यासाठी आमदार कराड यांच्या नेतृत्त्वावर विश्वास ठेवून सरपंच रवींद्र नागरगोजे यांच्यासह अनेकांनी भाजपत प्रवेश केला.

यावेळी भाजप किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, विधी आघाडीचे मनोज कराड, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, मुरढवचे सरपंच लक्ष्मण यादव, घनसरगावचे शरद दरेकर, दवणगावचे श्रीमंत नागरगोजे, सांगवीचे परमेश्वर जाधव, गुणवंत जोगदंड, बावचीचे नरेश चपटे, संतोष चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सरपंच रवींद्र नागरगोजे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य रविकांत नागरगोजे, उध्दव नागरगोजे, किशन नागरगोजे, मुकुंद नागरगोजे, महादेव नागरगोजे, राम काळसे, शिवाजी नागरगोजे, नागनाथ नागरगोजे, विभिषण नागरगोजे, बाळासाहेब नागरगोजे आदिंची उपस्थिती होती.



### संक्षिप्त वृत्त...

## शाळांच्या गुणवत्ता मूल्यांकनासाठी तिसऱ्यांदा मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखड्याबाबतची माहिती भरण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने तिसऱ्यांदा मुदतवाढ दिली. तीनवेळा मुदतवाढ देऊनही शाळा गुणवत्ता मूल्यांकन भरण्याकडे कानाडोळा करीत असल्याची बाब समोर आली आहे.
विशेषतः सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांनी स्वयं मूल्यांकन करून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने वेबसाईटवर टॅबवर स्क्रेटि डाटा नावाने स्वयं मूल्यांकनासाठीची लिंक उपलब्ध करून दिली आहे. याबाबत प्रथम पंधरा मार्च, नंतर ३१ मार्च अशी दोनवेळा मुदतवाढ देण्यात आली होती. आजपावेतो शंभर टक्के शाळांनी स्वयं मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण झालेली दिसून येत नाही. त्यामुळे शाळांचे स्वयं मूल्यांकन करण्यासाठी आता १० एप्रिल २०२५ पर्यंत तिसऱ्यांदा मुदवाढ देण्यात आली आहे. शिक्षण उपसंचालक, डाएट, शिक्षणाधिकाऱ्यांनी आपल्या विभागांतील सर्व व्यवस्थापनांच्या शाळांचे स्वयं मूल्यांकन नोंदणी व पुर्तता करावी, अशी दक्षता घेण्यास राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालकांनी बजावले आहे.

## विश्वस्त परिषद व कार्यशाळेचे लातुरात आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** राज्य शासनाच्या शंभर दिवसांच्या कृती आराखड्याच्या निर्देशानुसार तसेच राज्याचे धर्मादाय आयुक्त अमोघ कलोती यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर धर्मादाय आयुक्त व धर्मादाय वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.२) सकाळी १०.३० वाजता विश्वस्त परिषद व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

लातूर येथील अंबाजोगाई रोडवरील कॉक्सिट कॉलेजमध्ये ही कार्यशाळा होणार असून या परिषद व कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी लातूरचे धर्मादाय सह आयुक्त राजेश अ. सासणे राहणार आहेत. यावेळी धर्मादाय उपायुक्त एच. व्ही. एच. कादरी, सहाय्यक धर्मादाय आयुक्त -१ श्रीमती पी. आर. निकम आणि जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ड. शरद इंगळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या परिषदेत सी.ए. गणेश महापूरकर व पांडुरंग काबरा तसेच ॲड. एस.टी. जाधव व एस. एन. नागरगोजे हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहे. या परिषद व कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आवाहन कार्यक्रमाचे निमंत्रक व संयोजक यांनी केले आहे.

## शाळांची वेळ सकाळी सात ते सव्वाअकरा करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** उन्हाळ्यामुळे सर्व शाळांच्या वेळा सकाळच्या सात ते सव्वाअकरा या वेळेत कराव्यात, असे पत्र शुक्रवारी शिक्षण संचालकांनी काढले आहे. या पत्राच्या अधारे मराठवाड्यातल्या हिंगोली, नांदेड जिल्ह्यांतील शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळाच्या वेळा बदलल्या. लातूर जिल्ह्यात कधी बदल होणार, याकडे लक्ष लागले आहे.

उष्णतेच्या लाटांमुळे आरोग्यविषयी गंभीर समस्या निर्माण होण्याची संभावना लक्षात घेऊन जिल्हास्तरावरून उष्णतेचा लाटेचा प्रभाव कमी करण्यासाठी संबंधित प्रशासकीय विभाग, महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांनी करावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. राज्यात वाढलेल्या उन्हाच्या कडाक्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा विपरित परिणाम टाळण्यासाठी विविध संघटनांकडून शाळेची वेळ सकाळची करण्याबाबत निवेदन प्राप्त झालेली आहेत. काही जिल्ह्यांनी सकाळ सत्रात शाळा भरविण्याबाबत कार्यवाही केली.

सध्या लातूर जिल्ह्यात शाळांची वेळ सकाळी सव्वाआठ ते दुपारी एकपर्यंत ठेवली आहे. ही वेळ बदलून आता सकाळी सात ते सव्वाअकरा करण्याबाबत शिक्षण संचालकांनी सूचवले आहे. शाळांची वेळ बदल्याबाबत जि. प.च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्णय घेण्यास संचालकांनी सूचवले आहे. उन्हाळ्यात विद्यार्थ्यांच्या मैदानी, शारीरिक हालचाली टाळाव्यात. उन्हात वर्ग घेऊ नयेत. विद्यार्थ्यांना उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी शिक्षित करावे अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

## ‘जल जीवन’चा १० टक्के लोकवाटा भरण्यास ९२८ गावांचा कानाडोळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** गेल्या २०२१, २२ पासून जिल्ह्यातील ९२८ गावांमध्ये जल जीवन मिशन अंतर्गत कामे सुरू झाली. या मिशनसाठी केंद्र व राज्य सरकारने प्रत्येकी ४५ टक्के निधी दिला. १० टक्के निधी त्या त्या गावांतून लोकवाटा गोळा करून हे मिशन यशस्वी करण्याचे दोन्ही सरकारांनी ठरविले. मात्र, ९२८ गावांपैकी एकाही गावाने अजून स्वतःचा १० टक्के हिस्सा जिल्हा परिषदेकडे भरलेला नाही.

लोकवाटा भरला जात नसल्याने जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागासमोर एक नवा पेच निर्माण झाला आहे. ९२८ ग्रामपंचायतींकडे सुमारे २९ कोटी लोकवाटा थकला आहे. सद्यःस्थितीत ३८३ गावांची जल जीवन मिशन योजना पूर्ण झाली. ही गावे देखील १० टक्के लोकवाटा देण्यास तयार नाहीत. त्यामुळे योजनेच्या पूर्णत्वात अडथळे येत आहेत. शासनाच्या ९० टक्के उपलब्ध निधीतूनच जल जीवन मिशन योजनेची कामे सुरू आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना योजनेचे महत्त्व कळावे, त्याची गरज वाटावी म्हणून १० टक्के लोकवाटा गावांनी भरावा, असा उद्देश ठेवून योजना सुरू केली. हल्ली गुत्तेदारांची बिलं केंद्र आणि राज्य सरकारांच्या ९० टक्के निधीतूनच पेड केली जात आहेत. ग्रामपंचायतींकडील १० टक्के लोकवाट्यासंबंधी सरकार काय निर्णय घेते? याकडे जिल्हा परिषदेचे लक्ष लागले आहे. जल जीवन मिशनमुळे बहुतांश गावांचा पाणी प्रश्न निकालात निघत असल्याने लोकवाटा भरण्याची तत्परता ग्रामपंचायतींनी दाखवावी, अशी अपेक्षा आहे.

लातूर जिल्हा परिषदेंतर्गत जल जीवन मिशनद्वारे ९२८ गावांत कामे सुरू असली तरी आजवर फक्त ३८३ गावांत योजना पूर्ण झाली. यातील १८ गावांतील विहिरी सध्या कोरड्या पडल्या आहेत. विहिरींची खोली ७० फुटांपर्यंतच असल्याचे सांगण्यात येत आहे.

## आरोग्य व अध्यात्मिक शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** आधुनिक जिवनशैलीमुळे अनेकांना शारिरिक व मानसिक स्वास्थाचे अनेक विकार होऊ लागले आहेत. शारिरिक व मानसिक स्वास्थ निरोगी राहून विकार दूर व्हावे याकरिता इंटरनॅशनल असोसिएशन फॉर सायंटिफिक स्पिरिच्युअलिझमच्या वतीने लातुरात १० ते १६ एप्रिल या दरम्यान आरोग्य व अध्यात्मिक शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सिध्देश्वर मंदीर परिसरात असलेल्या सिध्देश्वर मंगल कार्यालयात सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरात अधिकाधिक लोकांनी सहभागी होऊन आपले शारिरिक व मानसिक स्वास्थ निरोगी ठेवावे असे आवाहन प्रसाद कुलकर्णी व डॉ. शिवानंद बिडवे यांनी केले आहे.

सध्याचे युग हे धावपळीचे आहे. यामुळे अनेक जण आधुनिक व चुकीच्या जीवनशैलीला बळी पडत आहेत. त्यामुळे अनेकांचे शारिरीक व मानसिक स्वास्थही हरवले जात आहे. यामुळे अनेक विकारही उद्भवत आहेत. विशेषतः अपचन, बध्दकोष्टता, स्थुलपणा, वाढणारे कोलेस्ट्रॉल, मधुमेह, रक्तदाब, संधीवात यासह हृदयविकारालाही सामोरे जावे लागत आहे.

बदलत्या जीवनशैलीमुळे मानसिक तणाव वाढून चिडचिडपणा, विस्मरण व निराशा आदीने अनेकजण ग्रासले जाऊ लागले आहेत. या सर्व समस्यांपासून समाधान मिळण्यासाठी व निरोगी आरोग्याकरिता इंटरनॅशनल असोसिएशन फॉर सायंटिफिकस्पिरिच्यु अलिझमच्या वतीने श्री रामचरित्र मानस या ग्रंथातील सिध्दांतावर आधारित मानस योगसाधना जीवन पध्दतीबाबत मार्गदर्शन करण्यात येते. या शिबिरात नागरिकांनी मोठ्या प्रमाणास सहभागी व्हावे असे आवाहन प्रसाद कुलकर्णी, डॉ. शिवानंद बिडवे यांनी केले आहे.



## वाचकांची नाळ काव्य व साहित्याशी जुळली पाहिजे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** येथील संत कबीर प्रतिष्ठान व महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त व संत कबीर प्रतिष्ठान चा रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त त्रैभाषिक कवी संमेलन भालचंद्र ब्लंड बँकेच्या सभागृहात डॉ. रणजीत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व उद्घाटक कवयत्री व शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, हिंदी चे कवी प्रकाश निहलानी, आशिष नागला, दक्खणी कवी डी. के. शेख, मराठीचे प्रख्यात कवी नारायण पुरी व योगीराज माने, प्रतिष्ठानचे सचिव डॉ. दिलीप गुंजरगे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

उद्घाटन प्रसंगी तृप्ती अंधारे म्हणाल्या, मनुष्याच्या मनात अतृप्त इच्छा आकांक्षेला अंतच नसतो. जीवनात सुखा पेक्षा पुढची आनंद अनुभूती आहे यातच जीवनाची तृप्ती आहे. ही तृप्ती काव्यानंदातुन मिळते. कविता लिहिणे- वाचणे व कविता जगणे याची अनुभूती वेगळी असते. माणसाला कवीते नुसार जगता आले पाहिजे, संत कबीर प्रतिष्ठान वाचकांची नाळ काव्य संमेलनातून साहित्यकांशी जोडत आहे याचा सार्थ अभिमान आहे.

संत कबीरांच्या मानवतावादी विचारा सोबत हिंदी राष्ट्रभाषेचा प्रचार प्रतिष्ठान करत आहे असे संबोधित केले. अकादमीचे सदस्य डॉ. सतीश यादव यांनी, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीच्या कार्याचा आढावा घेतला. कवी प्रकाश निहलानी यांनी आजच्या समाजाचे वास्तव मांडून हास्य-व्यंग्य कविता सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. शेतकऱ्यांची आत्महत्या, आजची फॅशन अनेक विषयावर हृदयस्पर्शी कवितेतून मानवी जीवनाच्या वास्तवावर प्रकाश टाकला. कवी डी. के. शेख यांनी दोन कुत्ते ही गजल सादर श्रोत्यांची मने जिंकली.

मराठीचे प्रख्यात कवी नारायण पुरी यांनी, श्रमाचं मूल्य बाजूला ठेवून अपेक्षा ठेवणारी जनता व शासनाची योजनांच्या माध्यमातून होणारी दमछाक याच्यासह स्त्रियांवर विशेषतः बालिकेवर होणा-या अत्याचारा बद्दल चिंता व्यक्त केली. छत्रपती शिवरायांचा महाराष्ट्रात बालिकेवर नराधम अत्याचार करत असतील तर आम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांचा जय जयकार करण्याचा अधिकार कोणी दिला अशा संदेश देणा-या कविता सादर करून रसिकांची दाद मिळवली.

युवा कवी आशिष नागला यांनी कवितांचे भावविश्व श्रोत्या समोर मांडले. कवी योगीराज माने यांनी हिंदी मराठी कवितेच्या माध्यमातून नागरीकांच्या व्यथा मांडल्या.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. रणजीत जाधव यांनी कबीर प्रतिष्ठानच्या स्थापनेचा उद्देश विशद करून मागील २५ वर्षाच्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. प्रभाकर स्वामी व अकादमीचा नंददुलारे वाजपेयी समीक्षा पुरस्कार प्राप्त डॉ. बालाजी भूरे यांचा शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ दिलीप गुंजरगे, सुत्रसंचलन योगीराज माने, विवेक सौताडेकर तर आभार प्रा. राजेश विभुते यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कबीर प्रतिष्ठानच्या पदाधिका-यांनी परिश्रम घेतले.

## नराधम मास्तरच्या कृत्याने ‘नवोदय’ला कलंक : विद्यार्थ्यांवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** येथील नवोदय विद्यालयातील एका विषय शिक्षकाने सलग तीन महिने तीन महिने तीन विद्यार्थ्यांवर अनैसर्गिक कृत्य केल्याचे चौकशी समितीच्या अहवालात सिध्द झाल्याने त्याच्याविरोधात लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरुजींमध्ये स्वतःच्या विद्यार्थ्यांवर अनैसर्गिक कृत्य करण्यापर्यंत विकृती निर्माण होणे शिक्षण व्यवस्थेलाच काळीमा फासणारे आहे. यामुळे लातूरचे नवोदय विद्यालयाच्या गुणवत्तेलाच कलंक फासला गेला आहे.

येथील बारा नंबर पाटीजवळ असलेल्या नवोदय विद्यालयात केंद्रीय बोर्डाचे शिक्षण दिले जाते. मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांनाही केंद्रीय बोर्डाचे शिक्षण मिळावे, यासाठी पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांची नवोदय परीक्षा घेऊन त्यांना सहावी व नववीच्या वर्गात प्रवेश दिले जातात. यासाठी अतिशय हुशार विद्यार्थीच या परीक्षेत उत्तीर्ण होतात. नवोदयचे विद्यार्थी म्हटले की, त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळाच असतो. लातूरच्या नवोदय विद्यालयातून आजपर्यंत दर्जेदार शिक्षण देण्यात आले आहे. यामुळे ते विद्यालय नामांकित आहे.

परंतु, येथेही व्यवस्थापनाचे दुर्लक्ष होत असल्याचे वारंवार होत असलेल्या दुर्घटनांवरून सिध्द होत आहे. यामुळे येथे शिक्षण घेण्यास येणारे विद्यार्थी सुरक्षित नाहीत का, असा सवाल उपस्थित होत आहे. ऑक्टोबर २०२४ ते जानेवारी २०२५ या तीन महिन्यांच्या कालावधीत याच विद्यालयातील हिंदी विषयाचा नराधम शिक्षक सोपान राजाराम कळमकर (वय ४९) याने तीन विद्यार्थ्यांवर अनैसर्गिक कृत्य केल्याचे चौकशी समितीच्या अहवालात समोर आले आहे.

त्याच्यावर लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीस विविध बाजुंनी चौकशी करीत आहेत. शिक्षक कळमकर हा दारू पितो. त्याने दारूच्या नशेतच असे विकृत अनैसर्गिक कृत्य केले असावे, असा पोलिसांचा अंदाज आहे. पोलीस विविध अंगांनी तपास करीत आहेत. स्वतःच्या गुणवत्तेवर लातूरने शिक्षणाचा पॅटर्न निर्माण केला आहे. अशा या पॅटर्नमध्ये केंद्रीय बोर्डाच्या एकमेवर शाळेत असे प्रकार सर्रास घडत असल्याचे दिसून येते. या शाळेचे मुख्याध्यापक आजारी रजेवर गेले आहेत. ते काम दुसऱ्याकडे सोपविण्यात आले आहे. मागील सहा महिन्यांपूर्वी पिण्याच्या पाण्याचा हौद उघडाच ठेवण्यात येत होता. त्यात कावळ्यांची विष्ठा पडल्यामुळे सर्वच विद्यार्थ्यांना गॅस्ट्रोची लागण झाली होती. त्यापूर्वीही जेवण निकृष्ट असल्याने तेथील विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. त्यानंतर आता थेट विद्यार्थ्यांवर अत्याचार केल्याने सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

## जलयुक्त शिवारच्या दुसऱ्या टप्प्यासाठी लातूरला ११ कोटी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** राज्य सरकारने जलयुक्त शिवार टप्पा दोन सुरू केला असून, जिल्हा परिषदेला जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष निधी म्हणून ११ कोटी रूपये जलयुक्त शिवारच्या कामास देण्याचे मान्य केले आहे.

जलयुक्त शिवार टप्पा दोनच्या माध्यमातून जिल्ह्यातील १२८ गावांमध्ये विविध प्रकारची कामे केली जाणार आहेत. त्यात पाझर तलावांतील गाळ काढणे, नदी, नाला खोलीकरण, रूंदीकरण तसेच पाणी अडवून जिरवण्यासह अन्य कामे केली जाणार आहेत. मात्र, हे काम करीत असताना शास्त्रशुद्ध पद्धत अवलंबावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. सध्या उन्हाळा सुरू झाल्याने ग्रामीण भागातून पाणी टंचाईच्या तक्रारी येत आहेत. जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत कामे झाली तर त्या त्या गावच्या शिवारात पाणी अडवून ते जिरवण्याचे काम होणार आहे. टप्पा दोनसाठी ११ कोटी आले असले तरी पुन्हा निधी उपलब्ध होणार आहे, असे लातूर जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले. उपलब्ध निधीतून जिल्ह्यातील १२८ गावांत जलयुक्त शिवारची विविध कामे होणार आहेत.

जलयुक्तची कामे करण्यासाठी फक्त दोन महिने हातात आहेत. या दोन महिन्यांत जास्तीत जास्त कामे करून जिल्हा परिसर पाणीदार करण्याचा प्रयत्न आहे. परंतु, कामे शास्त्रशुद्ध पद्धतीने व्हावीत, अशी अपेक्षा लातूर जिल्ह्यातुन व्यक्त होत आहे.

## प्रा. बालाजी पोद्दार यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनचे स्थापत्य अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. बालाजी शंकरराव पोतदार सेवानिवृत्त होत आहेत त्या निमीत्त त्यांना संस्थेच्या वतीने सत्कार करून निरोप देण्यात आला.

३५ वर्ष ६ महिने सेवेच्या इतक्या प्रदीर्घ कालावधीत त्यांनी हजारो स्थापत्य अभियंते घडवले. अनेकजण देश विदेशात आपले कर्तृत्व गाजवत आहेत. शेकडो विद्यार्थी शासकीय सेवेत उच्च पदावर कार्यरत आहेत. असंख्य विद्यार्थी बिल्डर, कॉंट्रॅक्टर व उद्योजक आहेत व अनेकांना त्यांनी नोकरी मिळवून दिलेली आहे.. असे अनेक माजी विद्यार्थी या निमित्ताने उपस्थित होते.

पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन च्या नावलौकिकामध्ये सरांचे महत्वपूर्ण योगदान राहिले. त्यांना निरोप देण्यासाठी माजी प्राचार्य गोपीनाथ पिंपळे, प्राचार्य बलभीम कुंभार, प्राचार्य डॉ. कमलाकर बकवाड , महिला तंत्रनिकेतनचे प्राचार्य सूर्यकांत राठोड, प्रा. रघुनाथ अलियास नंदू कुलकर्णी, प्रा. डॉ. शोभा आर्य, प्रा. सुधीर पोतदार,प्रा हेमंत कुलकर्णी, प्रा. विठ्ठल आवाळे , प्रा. इंद्रजीत आवले यांच्यासह माजी विद्यार्थी महाराष्ट्राच्या विविध भागातून आले होते.

यावेळी चेतन कुलकर्णी, आनंद पंडीत, संजय आयाचित, अजय बोराडे,किरण कोरे, प्रकाश साळुंके, राजेंद्र बिराजदार, ओमप्रकाश थोरमोटे, विनोद शिवशरण, अक्षय माने, रति जोशी, सरोजा जगताप, शुभांगी माळगे, दिप्ती भुरे , ऋग्वेदा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## सामूहिक नमाज पठणाने रमजान ईद उत्साहात



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** मुस्लीम बांधवांच्या पवित्र ‘ईद-उल-फित्र’ अर्थात रमजान ईदनिमित्त येथील ईदगाह मैदानावर सोमवारी (दि.३१) सकाळी मुस्लीम बांधवांच्यावतीने सामूहिक नमाज पठण करण्यात आले. यावेळी मैदानावर उपस्थित राहून मुस्लीम बांधवांची गळाभेट घेऊन हिंदू बांधवांनी ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सामूहिक नमाज पठणमध्ये मौलवींनी ‘नफरतों का दौर बंद हो’ अशी अल्लाहकडे प्रार्थना केली.

यावेळी आमदार विक्रम काळे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, तहसीलदार सौदागर तांदळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय शेटे, काँग्रेसचे शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव, प्रा. प्रवीण नाडे, प्रवीण कांबळे यांनी ईदगाह मैदानावर उपस्थित राहून गुलाबपुष्प देऊन मुस्लीम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. पोलीस प्रशासनाने लातूर शहरासह मैदानाबाहेर चोख बंदोबस्त ठेवला होता.

## अनैतिक संबंधातून युवकाचा खून; आरोपीच्या पत्नीनेही घेतला गळफास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** अनैतिक संबंधाच्या संशयातून पाचजणांनी ऊस तोडण्याचा कोयता व कत्तीचे सपासप वार करून एका ४० वर्षीय युवकाचा खून केल्याची घटना रविवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास घडली. या घटनेतील सर्वच आरोपींना अटक केल्याशिवाय प्रेत ताब्यात घेणार नाही, असा पवित्रा मयताच्या नातेवाईकांनी घेतल्याने तणाव निर्माण झाला होता.

दरम्यान, सोमवारी (दि.३१) सकाळी या घटनेतील आरोपीच्या पत्नीनेही गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी रात्री उशिरा चौघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयत शरद प्रल्हाद इंगळे हा गावाशेजारील खडी केंद्रावर मॅनेजरचे काम करत होता. त्याच केंद्रावर आरोपीही कामाला होता. त्याला जेवणाचा डबा देणे व इतर कारणाने खडी केंद्रावर त्याच्या पत्नीची ये-जा होती. त्यातच त्यांचे प्रेम संबंध जुळले. तीन महिन्यांपूर्वीही मयत आणि आरोपीची पत्नी गाव सोडून पळून गेले होते.

मागील दोन-तीन दिवसांपूर्वी आरोपीचे काही पाहुणे त्याच्याकडे आले होते. रविवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास शरद इंगळे हा खडी मशीनवर कामाला गेला होता. आरोपीही खडी केंद्राकडे गेले. आरोपींनी कत्ती व कोयत्याने सपासप वार करून शरद इंगळेचा खून केला. घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक अशोक उजगरे व पोलीस हेड कॉन्स्टेबल बाबासाहेब खोपे, केशव सूर्यवंशी यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. सर्वच आरोपींना अटक करा, अन्यथा मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका नातेवाईकांनी घेतल्याने तणाव निर्माण झाला होता. याप्रकरणी रात्री उशिरा वैशाली इंगळे यांच्या तक्रारीवरून रोहन बाळासाहेब शिंदे, रोहित बाळासाहेब शिंदे, बाळासाहेब भारत शिंदे, गणेश भारत शिंदे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, सोमवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास या घटनेतील आरोपीची पत्नी सखुबाई बाळासाहेब शिंदे (वय ३९) यांनी गळफास लावून आत्महत्या केली. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# कर्तबगार महिला तहसिलदार गोरे कर्तव्यदक्ष पोलिस निरीक्षक सुरवसे यांची धडाकेबाज कामगिरी राशनचोर तांदूळमाफीया विजु कुरेशी, युसुफ खान यांच्या आवळल्या मुसक्या

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

आज दिनांक २९ मार्च रोजी सकाळी ७ वाजता तहसीलदार प्रतिभा गोरे यांना माहीती मिळाली की, परतुर येथून एका ट्रक मध्ये तांदूळ जात आहे. यावरुन तहसीलदार यांनी स्वत चा गाडीचा पाठलाग करुन पिंपरखेड वाटुर फाटाजवळ गाडी थांबवली त्या ट्रकचा नंबर एमएच २० जिसी २१२1 असुन चालक प्रविण घुले व क्लिनर धनंजय पांजगे यांना गाडी मध्ये काय आहे याबाबत विचारणा केली असता गाडीमध्ये तांदुळ असल्याचे सांगण्यात आले. सदरील तांदुळ परतुर येथुन विजु कुरेशी व युनूस शेख यांनी गाडी मध्ये तांदूळ भरुन देवुन गोंदिया कडे जाणे बाबत सांगितले असल्याचे देखील



ड्रायव्हर व क्लिनर यांनी सांगितले. याबाबत प्रतिभा गोरे यांनी पुढे सांगितले की, पोलीस निरीक्षक परंतुर हे त्याच्या पथकासह जायनोक्यावर हजर यादरम्यान झाले होते. तसेच वाहन चालक याना तांदुळ खरेदी बाबत पावती/कागदपत्रे बाबत मागणी केली असता तांदूळ बाबत पावती दाखवण्यात आली नाही. वाहक व चालक यांनी वजन काट्याची पावती दाखवली असुन पावती नुसार तांदुळाचे वजन ३० किलो ग्रॅम असल्याचे दिसुन आले. सदरील एक मधील तांदळाची अवैद्धरित्या वाहतुक होत असल्याचे प्रथम दर्शनीय दिसुन आल्याचे देखील तहसीलदार प्रतिभा गोरे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. स्वस्त धान्य दुकानांचा तांदूळ अवैधरित्या काळ्या बाजारात विकणाऱ्या टोळीने यापूर्वी देखील परतूर, मंठा व जालना तालुक्यातील तांदूळ काळा बाजारात विकला असून यापूर्वी देखील यातील काही आरोपींवर गुन्हे दाखल झालेले आहेत. याप्रकरणी विजू कुरेशी व युनुस शेख रा. परतुर व वाहन मालक अनिल घुले रा. जाहागिरदार कॉलनी छ. संभाजीनगर बाहनचालक प्रविण धुले रा. नांदी ता. अंबड जि. जालना क्लिनदर धनंजय पांजगे रा. धनगरपिंपरळगाय ता. अंबड यांचे विरुद्ध जिवनावश्यक वस्तु अधिनियम अंतर्गत १९५५ चे कलम ३ व ७ नुसार तसेच कलम ११९/२०२५ प्रमाणे फिर्यादी तहसीलदार परतुर श्रीमती प्रतीभा गोरे दाखल केलेला एफ आय आर मध्ये दिसून येते.

## संक्षिप्त

### रोटरी रेनबो व रत्ननिधी फाउंडेशनतर्फे मोफत जयपुर फूट शिबिर आयोजित



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

विविध सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या रोटरी क्लब जालना रेनबोतर्फे मुंबई येथील रत्ननिधी फाउंडेशनच्या सहकार्याने मोफत जयपुर फूट मोजमाप आणि वाटप शिबिराचे आयोजन केले आहे.

सदरील शिबिर मंगळवार दि. ८ एप्रिल रोजी रोजी सॅफ्रॉन हॉटेल या ठिकाणी होणार आहे. या शिबिरामध्ये विशेष करून गुडघ्याच्या वर पाय गमावलेल्या गरजू रुग्णांची नवीन तंत्रज्ञानाने विकसित केलेल्या जयपूर फूटचे मोफत वितरणासाठी प्रारंभी मोजमाप घेऊन नंतर वाटप केले जाणार आहे. या शिबिरामुळे अनेक व्यक्ती स्वावलंबी होऊन स्वतः चालू शकतील, अशी भावना क्लबचे अध्यक्ष महेश माळी व सचिव रो. गौरव करवा यांनी व्यक्त केली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. अतुल जिंतूरकर, डॉ कैलास दरगड व डॉ. रवी बेदरकर हे परिश्रम घेत आहेत. ८ एप्रिलपूर्वी महेश माळी (९४२२७२५२२), जयेश पहाडे (९८२३५०७३९९) यांच्याकडे नाव नोंदणी करून जास्तीत जास्त गरजूंनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकल्प प्रमुख जयेश पहाडे आणि डॉ. प्रशांत पळनिटकर यांनी केले आहे.

### टेंभुर्णी सोसायटीच्या व्हॉईस चेअरमनपदी मारोती पंडीत



**तभा वृत्तसेवा**
**टेंभूर्णी/प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील अ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या व्हाईस चेअरमनपदी मारुती पंडित यांची आज दि.२८ रोजीबिनविरोध निवड करण्यात आली.

विद्यमान व्हाईस चेअरमन अंकुश देशमुख यांनी पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या या पदावर श्री. पंडीत यांची निवड करण्यात आली. अंकुश देशमुख यांनी श्री.
मारोती पंडीत यांचे नाव सुचवले तर संचालक ठकसेन उखर्डे यांनी त्यास अनुमोदन दिले. चेअरमन गणेश धनवई यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सदर प्रक्रिया पुर्ण करण्यात आली. यावेळी बाबुखा पठाण, अमोल देशमुख, अर्जुन देशमुख, विष्णू जोशी, गणेश उखर्डे, रुखमनबाई भागवत, नारायण उखर्डे, शोभाबाई गावंडे, विजय मघाडे यांची उपस्थिती होती.

यावेळी निर्वाचन अधिकारी म्हणून ए. के. म्हस्के यांनी काम पाहिले. त्यांना श्री. वाकळे यांनी सहकार्य केले. त्यांच्या या निवडीबद्दल जाफराबाद पत्रकार संघाच्या वतीने, विष्णु मगर, रावसाहेब अंभोरे, मुकेश भारद्वाज, विशाल वाकडे, पीजी तांबेकर, आदींनी अभिनंदन केले आहे.

## मुरूम तस्करांची नायब तहसीलदारांना मारहाण; महिन्यातील चौथी घटना

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

अवैध मुरूम उत्खननास मज्जाव केल्याने तस्करांनी जालना जिल्ह्यातील मंठ्याच्या नायब तहसीलदार स संजय शिंदे यांना मारहाण केल्याची घटना दहिफळ खंदारे (ता.मंठा, जि. जालना) येथे रविवारी रात्री १०.३० वाजता घडली. याप्रकरणी नायब तहसीलदार यांच्या फिर्यादीवरून मंठा पोलीस ठाण्यात तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या भागात अनेक दिवसांपासून विनापरवाना गौण खनिजाचे उत्खनन होत असल्याच्या तक्रारी महसूल प्रशासनाला प्राप्त झाल्या होत्या. त्याची दखल घेऊन नायब तहसीलदार संजय शिंदे हे आपल्या सहकारी-कर्मचाऱ्यांसह रविवारी रात्री दहिफळ खंदारे या गावी कारवाईसाठी गेले होते. मात्र हे पथक आल्याचे पाहताच तस्करांनी अरेरावी करून नायब तहसीलदार शिंदे यांना बेदम मारहाण केली. याप्रकरणी मंठा पोलीस ठाण्यात नायब तहसीलदार यांच्या फिर्यादीवरून संभाजी खंदारे व दोन जनाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस निरीक्षक निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संतोष माळगे हे तपास करत असल्याची माहिती पोलीस सूत्राने दिली आहे. १५ दिवसांपूर्वीच जालना जिल्ह्यातील परतूरच्या तहसीलदार प्रतिभा गोरे यांना वाळू तस्करांनी धक्काबुक्की केली होती. तसेच मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे व नायब तहसीलदार काळदाते आता यांच्यासह ही महसूल पथकावरील हल्ला झाल्याची ही चौथी घटना आहे.



जालना शहरातील सदर बाजार ईद गाह येथे ईद उल फितर ची नमाज अदा करण्यात आली यावेळी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते. ईद च्या शुभेच्छा देताना माजी मंत्री आ अर्जुन खोतकर सोबत शिवसेना सहसंपर्क नेते फेरोज लाला तांबोली, शिवसेना जिल्हा प्रमुख भाऊसाहेब घुगे, विष्णू पाचफुले, पंडित भुतेकर, एड शेख अश्फाक, शेख वसिम, पोलिस निरीक्षक संदीप भारती आदी

## डॉ.आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी नितीन राऊत यांची निवड



### उपाध्यक्षपदी अमोल गायकवाड, सचिवपदी श्रीकांत पारवे, कोषाध्यक्ष श्रीकांत आढावे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव २०२५ साठी नुकतीच सिद्धार्थ नगर येथील समिती गठित करण्यात आली सिद्धार्थ नगर जाफराबाद येथे बैठक घेण्यात आली या बैठकीत सर्वानुमते सार्वजनिक डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या २०२५ च्या अध्यक्षपदी नितीन राऊत, उपाध्यक्षपदी अमोल गायकवाड सचिवपदी श्रीकांत पारवे कोषाध्यक्ष श्रीकांत आढावे याची निवड झाली करण्यात आली आहे.
दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती जन्मोत्सव अतिशय उत्साहात आणि थाटात साजरा करण्यात येणार असल्याचे यावेळी नवनिर्वाचित कार्यकारणी यांनी सांगितले आहे.
या निवड बद्दल सर्व नवनिर्वाचित कार्यकारिणीचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे यावेळी पी के राऊत एम डी जाधव प्रा वैद्य सर सुखदेव आढावे निंबाजी हिवाळे संजय चव्हाण सर संजय भिसे शिवाजी गायकवाड राजेश वाघ मधुकर दांडगे ऍड वाहुळे धनराज भिसे प्रशांत कानंदे सचिन जाधव कुणाल दांडगे अमोल आढावे सिद्धार्थ नगर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हमीभाव खरेदी केंद्राचे आमदार संतोष दानवे यांच्या हस्ते शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून विविध कल्याणकारी योजनाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. मुळातच महायुती सरकारचे धोरण हे शेतकऱ्यांच्या बाजुने असल्याने शेतमालाला वाढीव भाव देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांनी इतर बाजारपेठेच्या तुलनेत हमीभाव खरेदी केंद्राचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन जाफ्राबाद-भोकरदनचे आ.संतोष पा. दानवे यांनी वरुड बु (ता. जाफ्राबाद) येथे बोलतानी केले. वरुड बु. येथे कृषक मंगलम फार्मर प्रोड्युसर कंपनी तथा हमीभाव कडधान्य खरेदी केंद्राचा शुभारंभ आ. संतोष पा. दानवे यांच्या हस्ते करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष नाना भागिले, उत्तमराव वानखेडे, शेषराव कळंबे, चंद्रकांत साबळे, सचिन अपार, गणेशराव ठाले, सुधीर पाटील, राजू साळवे, तुळशीराम पायघन, विलास शिंदे, विजय परिहार, कृषी अधिकारी अमोल शिंदे, रविराज जैस्वाल, मधुकर पडघन, उध्दव दुनगहु आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना आ. दानवे म्हणाले की, दळणवळणाची सुविधा उपलब्ध झाल्याने जाफ्राबादला मिरचीची मोठी बाजारपेठ निर्माण झाली आहे. त्याचा फायदा शेतकऱ्यांना झाला आहे. यावेळी सुनील ताठे, गजानन शिंदे, दत्ता हांडगे, राजेंद्र आमले, कदीर टेलर, विठोबा सोलाट, कडुबा शितोळे, कैलास वायाळ, राजेंद्र परीहार, सुनील काळे, संतोष ठाकरे, सचिन जैस्वाल, राजू चिडे, कृष्णा सिरसाट, राजेंद्र लोखंडे, अमोल पडघन, संजय गौतम, नाना पंडीत, गणेश चव्हाण, कुलभुषण पडघन, प्रकाश लोखंडे, प्रशांत वायभट, गणेश विभुते, विष्णू शिंदे, ईश्वर परीहार, रघुनाथ भोपळे, गोपाल काळे, गणेश जंजाळ, अनंता अंभोरे, साहेबराव भुतेकर यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक अमोल पडघन यांनी केले. तर सुत्रसंचालन कैलास सुसर यांनी केले.

## देऊळगाव राजा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा माजी विद्यार्थ्यांची पीएसआय पदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**टेंभूर्णी/प्रतिनिधी**

देऊळगाव राजा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी दिलीप तुकाराम कव्हळे याची पोलीस उपनिरीक्षक(झडख) पदी नुकतीच निवड झाली. दिलीप हा देऊळगाव राजा तालुक्यातील निमखेड या लहानशा खेड्या गावचा विद्यार्थी . वडील शेतकरी असुन , ते शेती करतात , गावात फक्त चौथी पर्यंत जिल्हा परिषद शाळा असल्याने पुढील शिक्षणासाठी वर्ग ५ वी ला देऊळगाव राजा हायस्कूल मध्ये मराठी माध्यमात प्रवेश घेऊन १२ वी पर्यंत चे शिक्षण घेतले



. नंतर पुणे येथे फर्ग्युसन कॉलेज मध्ये प्रवेश घेऊन पदवी पूर्ण करीत असताना स्पर्धा परीक्षेची आवड असल्याने , स्पर्धा परीक्षेची तयारी केली.जिद्द व मेहनतीच्या बळावर आणि गरीबीवर मात करत त्यांनी हे यश संपादित केले. दिलीप कव्हळे ने २०१९ मध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. २०२१-२२ मध्ये मुख्य परिक्षेत पात्र होऊनही अपयश आले. मात्र त्यांनी जिद्द सोडली नाही. २०२३ चझडउ च्या सर्व मुख्य परिक्षेस पात्र होऊन यामुळेच त्याची तलाठी पदांची नियुक्ती मिळुन तो भोकरदन महसुलात काठोरा बाजार या गावी तलाठी पदावर कार्यरत असताना २०२३ चझडउ दिलेल्या परिक्षेचा २५ मार्च रोजी निकाल लागला असुन, आता पोलीस उपनिरीक्षक या पदावर निवड झाली आहे.

## रुक्मिणी परिवाराच्या चैत्र पालवी संगीत कार्यक्रमाने जालनेकर रसिक झाले तृप्त

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

गुढीपाडवा आणि नवसंवत्सराच्या निमित्ताने रुक्मिणी परिवार, जालना यांच्यावतीने शनिवार दि. २९ मार्च रोजी आयोजित चैत्र पालवी हा संगीत व नृत्याविष्कार कार्यक्रम रुक्मिणी गार्डन येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा परिवाराचा रौप्य महोत्सवी कार्यक्रम होता.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजीनगर येथील ध्यास परफॉर्मिंग आर्ट्सच्या संचालिका केतकी नेवपूरकर यांच्या विद्यार्थिनींनी शारदा वंदना आणि श्रीराम स्तुतीवर आधारित नृत्य




सादरीकरणाने झाली. प्रसिद्ध टीव्ही कलाकार चैतन्य कुलकर्णी, शाल्मली सुखटणकर आणि प्राची खोत यांनी मराठी आणि हिंदी संगीताच्या सुरेल सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. प्रा. सचिन नेवपूरकर यांच्या संकलन आणि संचालनाखाली भेटी लागे जीवा, अभिर गुलाल उधळीत रंग, मायेच्या हळव्या... मन उधाण वाऱ्याचे, मी मज हरपून बसले गं, येऊ कशी प्रिया, जागर आईचा जागर यांसारखी भावगीते तसेच लग जा गले, अभी ना जाओ छोड़कर, मधुबन में राधिका नाचे रे, ओ संजना, बरखा बहार आयी, हो यारा सिली सिली, सलोना सास गझल अशा हिंदी गाण्यांचे सादरीकरण झाले. याशिवाय श्रीराम स्तुती, जय स्तुते श्री महामंगले, गीत रामायण मेळोडी, देवीचा गोंधळ, नदीच्या पल्याड या भक्तिगीतांनी आणि लोकसंगीतानेही कार्यक्रमात रंगत आणली. काही गाण्यांना वन्स मोर मिळाला तर देवीच्या गोंधळावेळी रसिक नृत्याच्या ठेक्यावर बेभान झाले.

कीबोर्डवर राजेंद्र तायडे आणि राजेश देहाडे, बासरीवर गिरीश काळे, ऑक्टोपॅडवर अमित निर्मल, तबल्यावर गोपाल खोमणे आणि गिटारवर अजय तायडे यांनी साथसंगत केली. दमदार व अभ्यासपूर्ण निवेदन अभिजीत कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने झाले. प्रारंभी किशोर देशपांडे यांनी प्रास्ताविक केले तर सुनील जोशी यांनी आभार मानले. रुक्मिणी परिवाराच्या सदस्यांनी परिश्रमपूर्वक रौप्य महोत्सवी वर्ष मोठ्या थाटामध्ये साजरे केले. या कार्यक्रमास जालनेकर रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रम अधिक भव्य आणि संस्मरणीय बनवला.

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# संस्कार, समर्पण आणि सेवारूपाचे दर्शन

राष्ट्रनिर्माणाचे व्रत घेऊन गेल्या शतकभरापासून देशात समर्पितपणे समाजनिर्मितीचे अद्भुत कार्य करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या असंख्य सेवाकार्यांच्या शृंखलेतील एका अतूट धाग्याच्या निमित्ताने वर्षप्रतिपदेच्या दिवशी संघ आणि स्वयंसेवक यांच्यातील नात्याचे अनोखे दर्शन देशाला घडले. पंतप्रधान नरेंद्र मोदी नागपूरच्या संघ मुख्यालयास भेट देणार, संघाचे संस्थापक आणि आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांच्या स्मृतिस्थळाचे दर्शन घेणार, द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजींच्या स्मृतीस अभिवादन करणार हे अधिकृतरीत्या जाहीर झाल्यापासून संघाच्या विरोधकांना आणि भाजपचा पाडाव करण्यासाठी देव पाण्यात घालून बसलेल्या अनेकांना, नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी वैफल्याचे चटके सोसावे लागले असतील. या भेटीच्या निमित्ताने देशाचा पंतप्रधान व संघ यांच्यातील नात्याकडे वेगळ्या अपेक्षेने पाहणाऱ्या अनेकांना काहीतरी वैचारिक खाद्य मिळणार अशी अटकळ बांधू पाहणाऱ्या अनेकांना दिवसाअखेरीस नैराश्यानेदेखील ग्रासले असेल, यात शंका नाही. अर्थात, पंतप्रधानांच्या संघ मुख्यालय भेटीकडे व माधव नेत्रालय या संघप्रणीत प्रकल्पाच्या पायाभरणी समारंभाच्या निमित्ताने पंतप्रधानांनी आपले संघासोबतचे नाते सुस्पष्टपणे देशासमोर मांडले आणि संघसंस्कारांचा अभिमानपूर्वक उल्लेख करून संघकार्याची स्तुती केल्याने आनंद व समाधान वाटलेल्या नागरिकांची संख्या अगणित असली, तरी नैराश्य आलेल्यांच्या मानसिकतेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. संघ आणि भाजप यांच्या नात्याविषयी किंवा संघाच्या शंभर वर्षांच्या स्वार्थनिरपेक्ष समाजसेवेसाठी व त्यातून राष्ट्रनिर्माणाच्या कार्याविषयी द्वेषमूलक भावनेने सातत्याने टीका करणाऱ्यांची मानसिकता ही त्यांच्या अपयशाची किंवा त्यांच्यातील मानसिक न्यूनगंडाची भावना असते, हे वारंवार स्पष्ट झाले असले, तरी त्यांच्या द्वेषभावनेतून व्यक्त होणारा विखार बेदखलही करता येणार नाही. गुढीपाडव्याच्या दिवशी माधव नेत्रालयाच्या पायाभरणी समारंभाच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलेल्या भावना हेच अनेकांच्या नैराश्याचेही कारण ठरले असावे. याच भेटीच्या निमित्ताने अशा अनेकांच्या अनंतकाळापासून प्रतीक्षित असलेल्या अपेक्षांचे प्रतिबिंब उमटेल व मोदी-संघ यांच्यातील नात्याविषयीच्या वावड्यांना नवे बळ मिळेल अशी अटकळ बांधली जात असताना, मोदी यांनी त्यांचा पूर्ण भ्रमनिरास केलाच, पण संघ व भाजप आणि सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील संबंधांचे हळवे धागे हळुवार पण स्पष्टपणे देशासमोर उलगडून अशा अनेक वावड्या आणि शंका-संशयांना कायमचा पूर्णविराम दिला. इतकेच नव्हे, तर आपण संघाचे निष्ठावान स्वयंसेवक आहोत याची स्पष्ट शब्दांत ग्वाही देताना, राष्ट्रभावनेच्या संस्काराचे बाळकडू संघाच्या शाखेतूनच मिळाल्याचा अभिमानास्पद उल्लेख करून संघाच्या राष्ट्रकार्यास एक प्रकारे संपूर्ण मान्यता मिळवून दिल्याने, संघाविषयी पसरविलेल्या संभ्रमाच्या जाळ्यात गुरफटलेल्यांच्या मनातील प्रश्नांची जळमटे कायमची दूर करण्याचे महत्त्वाचे कार्यदेखील पूर्ण झाले आहे.

आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांची जयंती आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गौरवशाली प्रवासाच्या शताब्दी वर्षाची आठवण करून देणाऱ्या माधव नेत्रालयाच्या विस्तारित प्रकल्पाच्या समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उपस्थिती असणार व या निमित्ताने सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत व पंतप्रधान मोदी हे एका व्यासपीठावर एकत्र येणार असल्याने संघाशी संबंधित असलेल्यांच्या माना अभिमानाने उंचावल्या असतानाच, संघ-भाजपविषयीच्या विखाराने पछाडलेल्यांच्या मनात मात्र, वेगळ्याच भावना उचंबळून येत होत्या. समाजमाध्यमांवर त्याची पुसटशी चिन्हेही उमटू लागली होती. सरसंघचालकांची अलिकडील काही वक्तव्ये आणि भाजपच्या काही नेत्यांनी जाहीरपणे व्यक्त केलेले विचार यांचे या भावनांना अव्यक्त पाठबळ लाभल्यामुळे, या कार्यक्रमाच्या निमित्ताने एकाच मंचावर असेच काहीतरी घडणार अशी अटकळ बांधणाऱ्यांना एक तर संघ संपूर्ण समजला नाही आणि मोदी अजिबातच समजले नाहीत, हे पुरते स्पष्ट झाले. संघाच्या संस्कारातून घडलेल्या प्रत्येक स्वयंसेवकासाठी सरसंघचालकपदावरील व्यक्ती ही परम पूजनीयच असते, हे पंतप्रधानांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीसच केलेल्या विनम्र उल्लेखातून स्पष्टपणे अधोरेखित केले, तेव्हाच भ्रमनिरासाच्या भावनेने वैफल्याचा पुढचा टप्पा गाठण्यास सुरुवात केली असावी. पुढे आपल्या संपूर्ण भाषणात पंतप्रधानांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार, द्वितीय सरसंघचालक माधवराव गोळवलकर गुरुजी यांच्या विचारांच्या आपल्यावरील प्रभावाची प्रचीती देत, भाषणाचे धागे गुंफले, तेव्हा समोर बसलेल्या श्रोतृवर्गाच्या मनात मोदी, संघ आणि संघकार्य यांच्याविषयीच्या अभिमानाने उंचीचा अंतिम स्तर गाठला असताना, मोदीविरोधकांचा मात्र मानसिक जळफळाट सुरू होता. संघाच्या स्थापनेपासून गेल्या शंभर वर्षांच्या वाटचालीत सुसंस्कृत समाजनिर्मितीच्या ध्येयाने सुरू असलेल्या स्वार्थनिरपेक्ष वाटचालीचा गौरवशाली उल्लेख करताना पंतप्रधानांनी या संघटनेच्या राष्ट्रनिर्मितीच्या कार्यातील सहभागाची जाणीवही देशाला करून दिल्याने, संघाविषयी विरोधकांनी पेरलेल्या संभ्रमातून अनेकांना मुक्ती मिळाली असेल, यातही शंका नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा भारताच्या अमर आणि अभिमानास्पद संस्कृतीचा आधुनिक अक्षयवट असून तो राष्ट्राच्या चेतनेस सातत्याने ऊर्जा देत आहे, ही पंतप्रधानांची ग्वाही संघाविषयी सातत्याने संभ्रम पसरविण्याच्या प्रयत्नांस मिळालेले चोख उत्तर आहेच, पण शंभर वर्षांपूर्वी राष्ट्रीय चेतनेच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी रुजू घातलेले हे बीज आता एक विशाल वटवृक्षात रूपांतरित झाला आहे, हे त्यांचे गौरवोद्गार म्हणजे संघकार्याच्या वाटचालीचा सन्मान ठरला आहे. जीवनाचे मोल हे त्याच्या कालावधीमध्ये नाही, तर उपयुक्ततेमध्ये आहे, हे गोळवलकर गुरुजींचे विचार उद्धृत करणाऱ्या मोदी यांना ऐकताना, त्यांच्या कारकीर्दीचे मर्मदेखील उपस्थितांना निश्चितच जाणवले असेल. स्वयंसेवक या नात्याने झालेले सेवाभावाचे संस्कार ही मोदी यांच्या कार्यशैलीची शिदोरी आहे. पारतंत्र्यांच्या काळातील स्वतंत्रता संग्रामातील संघाच्या भूमिकेवरून संभ्रम माजवून संघ-भाजपविद्वेषाची बीजे पेरण्याचा प्रयत्न काही मूठभर निराशाग्रस्तांकडून सातत्याने होत असतो. मोदी यांनी त्यांच्या भाषणातून दिलेल्या उत्तरातून या प्रश्नालाही कायमची मूठमाती मिळणार आहे. राष्ट्रीय गौरवाचा इतिहास लिहिला जात असताना, त्यामध्ये संघाचे योगदान अतुलनीय असे आहे आणि पारतंत्र्याच्या काळात देशातील जनतेची अस्मिताचिन्हे पुसून टाकण्याकरिता सातत्याने होणारे प्रयत्न हाणून पाडून सामाजिक अस्मिता चेतविण्याचे काम अविरतपणे करून संघाने भारतीयत्वाची सामाजिक जाणीव जिवंत ठेवली. सेवा हा संघाच्या संस्काराचे मूलमंत्र आहे, ही द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजींची शिकवण स्वतः आचरणातून अव्यक्तपणे देशाला संघकार्याची ओळख करून देण्याचा पंतप्रधानांच्या भाषणातून, भाजपने गेल्या दहा वर्षांत सत्ताकाळातील सेवाभावाने सुरू केलेल्या कामगिरीचाही आढावा घेतला. संघटन, समर्पण आणि सेवा ही संघकार्याची त्रिवेणी विकसित भारताच्या भविष्यातील वाटचालीची ऊर्जा ठरणार आहेच, पण विकसित भारताची वाटचाल ही संघाच्या इतक्या वर्षांच्या तपश्चर्येची फलश्रुती आहे, याची ग्वाही देत त्यांनी सत्तेच्या माध्यमातून राबविलेल्या सेवाभावाचे सारे श्रेयदेखील संघ आणि संघ संस्कारांस समर्पित करून एका सुसंस्कृत संघ स्वयसेवकाच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविले. भाजप आणि संघ यांच्यातील नात्यावर प्रश्नचिन्हे उमटविणाऱ्या, नेत्यांच्या नैमित्तिक वक्तव्यांचा आधार घेत नात्यामध्ये मिठाचे खडे टाकू पाहणाऱ्या आणि संघ-भाजपचा प्रभाव संपविण्याचे मनातले मांडे केवळ आभासी मंचांवर व्यक्त करीत आयुष्य वाया घालविणाऱ्या निष्क्रिय विचारवंतांना या एका कार्यक्रमातून मिळालेली मात्रा काहीशी कडवट लागली असेल, पण प्रामाणिकपणे ती मात्रा पचविण्याचा प्रयत्न केला, तर मनाला झालेला विकाराचा आणि विखाराचा आजार बरा करण्यासाठी ती पुरेशी ठरेल, यात शंका नाही.

## आंतरराष्ट्रीय

# नेपाळमध्ये पुन्हा राजेशाही येईल?

**प्रा. जयसिंग यादव**

नेपाळमध्ये राजेशाही लागू करण्याची मागणी प्रामुख्याने राष्ट्रवादी राष्ट्रीय प्रजातंत्र पक्षाकडून करण्यात येत आहे. सध्या नेपाळ आणि भारतातही धर्म आणि संस्कृतीचे पुनरुज्जीवन होताना दिसत आहे. नेपाळला २००७ मध्ये धर्मनिरपेक्ष राष्ट्र घोषित करण्यात आले. परिणामी, २००८ मध्ये तिथली राजेशाही व्यवस्था संपुष्टात आली. या चळवळीला 'राष्ट्र, राष्ट्रवाद, धर्म, संस्कृती आणि नागरिकांच्या रक्षणासाठी मोहीम' असा दर्जा दिला जात आहे. २००८ मध्ये नेपाळ प्रजासत्ताक बनल्यापासून तिथले व्यापारी दुर्गा प्रसाई चळवळीला चालना देत आहेत. एके काळी प्रसाई यांचे पंतप्रधान प्रचंड आणि ओली यांच्याशी जवळचे संबंध होते; पण आता ते त्यांचे कठोर टीकाकार आहेत. त्याच वेळी राजेशाहीच्या काळात गृहमंत्री राहिलेल्या कमल थापा यांनी हिंदू राष्ट्राच्या मागणीसाठी नवी आघाडी स्थापन केली आहे. यापूर्वीचे राजे ज्ञानेंद्र शहा यांनीही अचानक सक्रिय होऊन सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होण्यास सुरुवात केली आहे. ते मंदिरात होणाऱ्या पूजेला हजेरी लावत आहेत. खरे तर नेपाळच्या कम्युनिस्ट पक्षाने चीनच्या मांडीवर बसून भारतविरोधी मोहीम चालवल्याने देशातील जनता नाराज आहे. राजेशाहीबरोबरच हिंदू राष्ट्राच्या पुनर्स्थापनेची मागणीही जोर धरू लागली आहे. नेपाळमधील मुस्लिमही देशाला हिंदू राष्ट्र बनवण्याच्या बाजूने आहेत. नेपाळला हिंदू राष्ट्र बनवण्याच्या मागणीच्या समर्थनार्थ होणाऱ्या निदर्शनांमध्ये सहभागी असलेले राप्ती मुस्लिम सोसायटीचे अध्यक्ष अमजद अली यांनी इस्लामला वाचवण्यासाठी हे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

हिंदू राष्ट्राचा दर्जा रद्द केल्यानंतर नेपाळमध्ये ख्रिश्चन मिशनरी अधिक सक्रिय झाल्याचे काही नेत्यांचे मत आहे. मिशनरी या परिस्थितीचा फायदा घेऊन लोकांचे धर्मांतर करत आहेत. माओवाद्यांच्या मुस्लिम मुक्ती मोर्चालाही मिशनऱ्यांचा वाढता प्रभाव मान्य नाही. राष्ट्रवादी मुस्लिम आघाडीलाही देशाची धर्मनिरपेक्ष ही ओळख नको आहे. ८० टक्के मुस्लिम जनता देशाची हिंदू अस्मिता पुनर्स्थापित करण्याच्या बाजूने आहे. नेपाळला पुन्हा हिंदू राष्ट्राचा दर्जा मिळावा, यासाठी राजेशाही समर्थक राष्ट्रीय प्रजातंत्र पक्ष आणि अनेक हिंदू संघटना अनेक दिवसांपासून मोहीम राबवत आहेत. नव्या संविधानात देशाची धर्मनिरपेक्ष ओळख संपुष्टात आणण्याबाबत राजकीय पक्षांमध्ये एकमत झाले. तेव्हापासून ही मागणी अधिक तीव्र झाली आहे. देशातील सर्व समाजाचे लोक मानतात की हिंदू अस्मितेच्या पुनर्स्थापनेशिवाय पर्याय नाही. धर्मनिरपेक्षता हे हिंदू-मुस्लिम ऐक्य तोडण्याचे षडयंत्र आहे. खरे तर सात वर्षांपूर्वी बुटवलमध्ये जुने राष्ट्रगीत गाताना दोन नेपाळी तरुणांना पोलिसांनी अटक केल्यापासून हे राष्ट्रगीत संपूर्ण नेपाळमध्ये सुरू असल्याने हिंदू राजवट बहाल करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. नेपाळ हा हिमालयाच्या कुशीत वसलेला एक छोटा आणि सुंदर देश आहे. चीनच्या सततच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे विशेषतः हिंदू धर्मीयांचा असलेला हा देश आपली मूळ संस्कृती आणि स्वातंत्र्य गमावून बसेल असे लोकांना वाटू लागले आहे. नेपाळ हा दक्षिण आशियातील देश आहे. त्याच्या उत्तरेला तिबेट हा चीनचा स्वायत्त प्रदेश आहे, जो चीन गिळंकृत करत आहे. दक्षिण-पूर्व आणि पश्चिमेला भारताची सीमा आहे. नेपाळची ८५.५ टक्के लोकसंख्या हिंदू आहे. त्यामुळे टक्केवारीच्या दृष्टीने हा सर्वांत मोठा हिंदू धार्मिक देश आहे. नेपाळमध्ये दीर्घकाळ राजेशाही होती; परंतु राजेशाहीच्या रक्तरंजित आणि दुःखद अंतानंतर माओवादी नेते प्रचंड हे पंतप्रधान झाल्यानंतर सरंजामशाही आकुंचन पावू लागली आणि १८ मे २००६ रोजी राजाचे अधिकार कमी करून आणि नेपाळला धर्मनिरपेक्ष देश घोषित करून माओवादी लोकशाहीला सुरुवात झाली. तेव्हापासून चीनच्या हस्तक्षेपामुळे या ठिकाणची मूळ रचना बदलण्याबरोबरच भारतासोबतचे संबंधही बिघडू लागले.

पंतप्रधान असताना के. पी. शर्मा ओली यांनी चीनच्या दबावाखाली भारतासोबतच्या वैमनस्यपूर्ण संबंधांचा पाया तर घातलाच; शिवाय चीनच्या सैन्याला मोकळे हात देऊन जमीनही गमावली. नेपाळमध्ये लोकशाही व्यवस्था प्रस्थापित झाली आहे; पण कमकुवत नेतृत्वामुळे हा देश आपले अस्तित्व गमावण्याच्या मार्गावर आहे. आता पुन्हा ओली पंतप्रधान झाल्याने चीनचा हस्तक्षेप वाढणार आहे. नेपाळ आणि भूतानमधील १८५० किलोमीटर लांबीची सीमारेषा कोणत्याही मजबूत गस्तीशिवाय खुली आहे. असे असूनही चीन, पाकिस्तान आणि बांगलादेशसारखा वाद तेथे नाही. पासपोर्टशिवाय हालचाली सुरू आहेत. जवळपास ६० लाख नेपाळी भारतात काम करून आपला उदरनिर्वाह करत आहेत. नेपाळमध्ये लोकशाहीच्या नावाखाली लोकांना फसवल्यासारखे वाटू लागले आहे. राजेशाही आणि हिंदू राष्ट्राच्या मागणीने हिंसक आंदोलनाचे रूप धारण केले आहे. लोक रस्त्यावर उतरले असून सुरक्षा दलांशी चकमक होत आहे. अलिकडेच नेपाळची राजधानी काठमांडूसह अनेक भागांमध्ये आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाली. राजेशाही संपली आणि नेपाळमध्ये लोकशाही प्रस्थापित झाली तेव्हा लोकांची अपेक्षा होती की अनेक चांगल्या गोष्टी घडतील; परंतु गेल्या १६ वर्षांमध्ये नेपाळमध्ये दहा सरकारे बदलली आहेत. खुर्ची आणि युतीच्या वादात जनहिताच्या योजना राबवता आलेल्या नाहीत. सरकारमध्ये भ्रष्टाचाराने कळस गाठला असून चीनही विकासाच्या नावाखाली नेपाळचे शोषण करत आहे. या देशाचे भारतासोबतचे संबंधही बिघडू लागले आहेत. आता लोकांचा असा विश्वास आहे, की मजबूत केंद्रीय नेतृत्व आणि लोककल्याण केवळ राजेशाहीतच शक्य आहे. नेपाळच्या इतिहासात असे अनेक राजे होते, ज्यांच्या कारकीर्दीत जनता समाधानी होती. तेव्हा लोकांच्या सुरक्षिततेचीही काळजी घेण्यात आली. लोक नेपाळचा राजा वीरेंद्र यांनाही चांगला शासक मानत. १९ फेब्रुवारी रोजी पूर्वीचे राजा ज्ञानेंद्र शहा त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचले. त्याच्या समर्थनार्थ लोकांनी मोटारसायकल रॅली काढली. 'राजे या, देश वाचवा' हा संदेश त्यांनीच दिला. नेपाळ हे हिंदू राष्ट्र मानले जात होते. राजेशाहीच्या काळात हिंदू राष्ट्र अशी नेपाळची ओळख होती; मात्र येथे लोकशाही आल्यानंतर कम्युनिस्टांचे वर्चस्व निर्माण झाले. राजेशाहीमध्ये स्थिरता होती. नेपाळमधील बहुसंख्य हिंदूंना आपली संस्कृती केवळ राजेशाहीतच जतन केली जाऊ शकते, असे वाटते.

नेपाळमध्ये १९९० मध्ये लोकशाहीची चळवळ सुरू झाली. यानंतर तेथे बहुपक्षीय व्यवस्था सुरू झाली. राजा महेंद्र शहा यांच्यानंतर त्यांचा मुलगा वीरेंद्र शहा यांनी सरकारच्या समन्वयाने घटनात्मक सम्राट म्हणून काम केले. २००१ मध्ये राजघराण्याचे हत्याकांड झाले आणि राजा वीरेंद्र शहा यांच्यासह कुटुंबातील अनेक जण मारले गेले. यानंतर ज्ञानेंद्र शहा यांनी गादी हाती घेतली. २००५ मध्ये त्यांनी देशातील लोकशाही संपुष्टात आणून लष्करी राजवट लागू केली. यानंतर त्यांच्या या निर्णयाला विरोध होऊ लागला. २००८ मध्ये राजेशाही संपुष्टात आली आणि नेपाळला प्रजासत्ताक घोषित करण्यात आले. सध्याची परिस्थिती पाहता राजेशाही परत येणे शक्य वाटत नाही; मात्र जनतेची नाराजी अशीच सुरू राहिली आणि पारंपरिक राजकीय पक्षांनी स्वतःमध्ये सुधारणा न केल्यास या आंदोलनाला आणखी बळ मिळू शकते. नेपाळसाठी खरा प्रश्न राजे राजकारणात परत येतील की नाही हा नाही, तर नेपाळची सध्याची राजकीय व्यवस्था जनतेचा विश्वास जिंकू शकेल का हा खरा प्रश्न आहे.

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# हिंदू राष्ट्राचे पाईक आम्ही...

हिंदू धर्म प्राचीन आहे. पूर्वीची सनातन व्यवस्था म्हणजेच हिंदू धर्म होय. निसर्गाचे काही नियम असतात आणि ते सनातन असतात. अर्थातच शाश्वत असतात आणि काळ बदलला तरी निसर्गाचे शाश्वत स्वरूप बदलत नाही. या नियमाचे पालन करणे म्हणजेच सनातन धर्म होय. इतिहास साक्षी आहे, हिंदूंनी कधीच कुणावर अन्याय अथवा अत्याचार केलेला नाही. तरीही भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्यास हिंदूंचाच विरोध आहे. भारताला मातृभूमी मानणारा आणि आपल्या महापुरुषांप्रति आदर बाळगणारा प्रत्येक व्यक्ती हिंदू असल्याचे धर्मवेत्त्यांनी मानले आहे. त्यामुळे भारतास हिंदू राष्ट्र घोषित केले तर इतरांवर अन्याय होईल, ही भीती निराधार आहे. केवळ राजकीय लाभासाठी ही भीती इतर धर्मीयांना दाखवून सत्तेसाठी हे लोक आपल्या भावी पिढ्यांचा बळी देत आहे. भविष्यात हिंदू आपल्याच भूमीत अल्पसंख्यक होण्याचा धोका आहे. हिंदू अल्पसंख्यक झालाच तर त्याला आपल्याच भूमीतून बहिष्कृत व्हावे लागेल आणि तेव्हा हिंदू राष्ट्राला विरोध करणाऱ्यांच्या पिढ्यांनाही लाचारीचे जीवन जगावे लागेल! हिंदू धर्मात पंथवादाला थारा नाही. त्यामुळे भारत हिंदू राष्ट्र घोषित झाल्यास 'हिंदू' हीच ओळख सर्वांची उरेल आणि जातिव्यवस्था कमकुवत होत जाईल. अखंड भारताचा विस्तार इंडोनेशियापर्यंत होता. आजही इंडोनेशियात हिंदूंच्याच देवी-देवतांची पूजा केली जाते. 'आम्ही आमचे पूर्वज बदलले, संस्कृती नाही' असे तेथील सत्ताधारी सांगतात. परंतु, आता परिस्थिती खूप भिन्न आहे. २२ देशांचा समावेश अखंड भारतात होता. तब्बल २४ वेळा भारताची फाळणी झाली आणि तरीही हिंदूंचे हक्काचे राष्ट्र नाही! हिंदू मुळातच सहिष्णू व परोपकारी असल्याने सर्वधर्मसमभाव अथवा धर्मनिरपेक्षतेची गरज उरत नाही. परंतु, केवळ राजकारणासाठी या शब्दांचा वापर वारंवार केला जातो. १२ व्या शतकात मध्य आशियात चंगेज खान नावाचा मंगोलियन शासक होऊन गेला. त्याने जवळपास ४ कोटी हत्या केल्या. चंगेज खानाने मुस्लिम धर्माचा नायनाट करण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

मात्र, आज चंगेज खानाचेच वंशज मुस्लिम आहेत! भारतातील मुस्लिम महिलांना सर्व प्रकारचे अधिकार प्राप्त आहे. परंतु, अफगाणिस्तान, इराण अथवा पाकिस्तानातील महिलांवर प्रचंड निर्बंध लादले जातात. अशाही परिस्थितीत भारतातील राजकारणी गठ्ठा मते पदरात पाडून घेण्यासाठी देश आणि देशवासीयांशी बेईमानी करतात. मुंबईवरील २६/११ चा हल्ला पाकिस्तानी आतंकवाद्यांनी नाही, तर भारतीयांनीच केल्याचे सांगतात! आज भारतात २२ कोटींपेक्षा जास्त मुस्लिम राहतात. २०४७ पर्यंत मुस्लिमांची संख्या ३५ कोटींवर जाण्याची शक्यता आहे. हिंदूंनी आपसी मतभेद आणि सत्तेचे राजकारण सोडले नाही तर इतिहासाची पुनरावृत्ती होणारच नाही, कशावरून? त्यामुळे २०४७ पर्यंत भारताला विश्वगुरुपदी आरूढ करतानाच हिंदू राष्ट्र घोषित करणे काळाची गरज आहे. मोहंमद बिन कासिम याने ७ व्या शतकात भारतावर आक्रमण केले. परंतु, हिंदुस्थानात त्यावेळी काश्मीरचे ललितादित्य, राजपुतानामध्ये बाप्पा रावल, चालुक्यचे विक्रमादित्य, नागभट्ट यशोवरमान आणि कैक हिंदू राजांनी ३०० वर्षे यवनी सत्तेवर अंकुश ठेवला. पण, नंतर आपसी मतभेद भोवले. मोहम्मद गजनीने १० व्या शतकात १७ वेळा भारतावर हल्ला केला. ११ व्या शतकात मोहम्मद घोरीने आक्रमण केले. पृथ्वीराज चव्हाण यांनी त्याला तब्बल १६ वेळा पराभूत करूनही वारंवार जीवदान देण्याचा मूर्खपणा केला. शेवटच्या लढाईत मोहम्मद घोरी जिंकला आणि त्याने पृथ्वीराज चव्हाण यांना हाल हाल करून मारले. भारत हिंदू राष्ट्र घोषित झाल्यास धर्माची अस्मिता वाढेल आणि पर्यायाने संस्कृती, धर्म, धर्माचरण आणि अभिमान वाढेल. परंतु, तरीही हिंदू राष्ट्राला विरोध केला जातो! १९७१ च्या मुक्ती युद्धात भारताच्या मदतीने बांगलादेशने पाकिस्तानला धूळ चारली. त्यावेळी काही उत्साही स्वयंसेवक रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजींना ही वार्ता देण्यासाठी गेले. परंतु, गुरुजींनी याचा भारताला काहीही फायदा होणार नसल्याचे सांगून बांगलादेश भविष्यात भारताशी इमान राखणार नाही, अशी भविष्यवाणी केली. आज गुरुजींचा एकेक शब्द खरा ठरत आहे. आजही भारतातील मुसलमानच सर्वाधिक सुरक्षित आहे. कारण, सहिष्णुता हिंदूंच्या रक्तातच आहे. त्यामुळे भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्यास हरकत नाही. हिंदू राष्ट्राच्या समर्थनार्थ चळवळ उभारण्याची वेळ आलेली आहे. प्रत्येक देशप्रेमी नागरिकांनी यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. अन्यथा इतिहास आपल्याला कधीच माफ करणार नाही.

९८८१७१६०२७


## इतस्ततः

# अशा 'आशां'मुळेच आशा...

**दत्तात्रेय आंबुलकर**

स्वतःच्या समस्यांपासून सुटका झाल्यानंतर, त्यातूनच प्रेरणा घेत इतरांचे दुःख कमी करण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे असते. मराठवाड्यातील एकल महिला संघटनेशी जोडलेल्या असंख्य महिला, आज हेच कार्य करत आहेत. यामध्ये आशालता पांडे यांचे कार्य लाखमोलाचे. आशालता यांच्या माध्यमातून एकल महिला संघटनेच्या कार्याचा घेतलेला आढावा.

मराठवाड्याच्या बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई हे शहर प्रसिद्ध आहे. तेथील मंदिरांमुळे दूरवरून भाविक मंडळी, तिथे दर्शनासाठीं येत असतात. गेल्या ५० वर्षांत अंबेजोगाईला एक आणखी विशेष वारसा लाभला, तो 'शैक्षणिक पंढरी' होण्याचा. अल्पावधीतच या शहराने दर्जेदार शिक्षणामुळे, उभ्या महाराष्ट्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला. अशा या अंबेजोगाईच्या नावलौकिकात आता वैशिष्ट्यपूर्ण भर पडली, ती 'आशा' उपक्रमामुळे. योगायोग म्हणजे अंबेजोगाईच्या या आशादायी उपक्रमाची प्रयत्नशील सुरुवात करणाऱ्या महिलेचे नावसुद्धा आशाच आहे. आशालता पांडे या अंबेजोगाईच्या. वयाच्या अवघ्या १६व्या वर्षी त्यांचे लग्न झाले. त्यानंतर दोन मुलींसह आशालता यांना एकटे सोडून, त्यांचा नवरा घर सोडून गेला तो कधीही परत न येण्यासाठीच. परिणामी, 'आता तुला कसे वाटते', इथपासून ते 'आता तुझे कसे होणार?' या आणि अशा प्रश्नांचा ससेमिरा त्यांच्यामागे लागला, तो कायमचाच. यावर तोडगा व उदरनिर्वाहाचे साधन म्हणून, आशालता पांडे यांनी 'आशा' कर्मचारी म्हणून काम करण्यास सुरुवात केली. काम तसे आव्हानपर होतेच. मात्र, त्यांनी आपली जिद्द आणि प्रयत्न सुरूच ठेवले. तशातच त्यांची गाठ चित्राताई या समवयीन व समदुःखी सखीशी पडली. चित्राताईंची ओळख व सहवास यांतून, आशालतांच्या जीवनाचे चित्रच पालटून गेले. त्यांच्या जीवनाला नवे वळण आणि दिशा मिळाली होती. चित्राताईंच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनामुळे आशालता, महिला स्वयंसाहाय्यता बचतगटाच्या सदस्य, कार्यकर्त्या झाल्या. महिला स्वयंसाहाय्यता बचतगटाच्या व्यवस्थेतून, आशालता यांना 'महिला मूलभूत नेतृत्व क्षमता विकास' अभ्यासक्रमात प्रवेश मिळाला. या अभ्यासक्रमाचा मुख्य फायदा म्हणजे, आशालता यांना त्यांच्यासारख्या महिलांच्या हक्कांची जाणीव झाली. पतीच्या मिळकतीत त्यांचा कायदेशीर वाटा त्यांना हक्क स्वरूपात मिळू शकतो, हे सुद्धा समजले.



प्रत्यक्षात आशालता यांच्या सासऱ्यांकडे पिढीजात घर होते. आशालता यांना या घरामध्ये रीतसर हिस्सा हवा होता, जो त्यांना कायद्याने मिळाला. त्यांच्या यासाठीच्या प्रयत्नांना, मराठवाड्यात महिला जागृती व हितरक्षणासाठी काम करणाऱ्या व विविध कारणांनी एकाकीपणे जीवन जगणाऱ्या 'एकल महिला संघटने'चे विशेष साहाय्य व मार्गदर्शन लाभले. या संघटनेच्या सदस्य महिलांची मराठवाड्यातील संख्या सुमारे २२ हजार आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. या सदस्य महिलांना संस्थेतर्फे त्यांच्या एकाकीपणाच्या पृष्ठभूमीवर, स्वावलंबनासह सन्मानाने जगण्यासाठी हरसंभव मदत केली जाते.

'एकल महिला संघटने'ची स्थापना मराठवाड्यात सुमारे दहा वर्षांपूर्वी झाली. संघटनेचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने मराठवाड्यातील बीड, लातूर, नांदेड व धाराशिव या जिल्ह्यांपुरते आहे. आशालता या संस्थेच्या महिला अत्याचारविरोधी विभागासाठी सक्रियपणे कार्यरत असून, त्यादृष्टीने त्यांचे महिला जागृतीचे काम सुरू आहे. संस्थेच्या कार्यकर्तृत्वामुळे व सक्रिय प्रयत्नांतून महिलांवरील अत्याचाराच्या घटनांविरोधात आवाज उठविण्याबरोबरच महिलांना मार्गदर्शन करणे, त्यांना सामाजिक अवहेलनेपासून मुक्तता देणे, कौटुंबिक हिंसाचारप्रसंगी संरक्षण व मार्गदर्शन करणे, कायदेशीर मदत उपलब्ध करून देणे, गरजूंच्या निवासाची व्यवस्था करणे व या महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी रोजगार-स्वयंरोजगारविषयक मदत व मार्गदर्शनही केले जाते. आजमितीस संस्थेशी संबंधित सुमारे ५०० संलग्न संस्था, महाराष्ट्र व राजस्थानमध्ये कार्यरत आहेत. या संस्थांना स्थानिक स्वयंसेवी संस्थांचीही साथ मिळत असते. संस्थेतर्फे 'पीडित महिलेच्या प्रश्नांची महिलांकरवी सोडवणूक' हे ध्येयवाक्य निश्चित करण्यात आले असून, त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू आहे. याचा लाभही संबंधित महिलांना होत आहे, हे विशेष. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून, महिला सक्षमीकरण प्रबळ करण्याच्या उद्देशाने 'महिला नेतृत्व सक्षमीकरण' हा उपक्रम विशेषत्वाने राबविण्यात येत आहे. संस्थेतर्फे 'महिलांद्वारा महिलांचे नेतृत्व' या विषयावरील विशेष प्रशिक्षण आयोजित केले जाते. गेल्या सुमारे दहा वर्षांत या नेतृत्व विकासविषयक प्रशिक्षणाचा लाभ सुमारे ६९ टक्के सदस्य महिलांनी घेतला असून, त्याद्वारे महिलांमधूनच सक्रिय नेतृत्वाची एक मोठी फळीच तयार झाली आहे. यामध्ये ग्रामीण व मागासवर्गीय समाजातील महिलांची संख्या मोठी आहे. बालपणापासून वा प्रसंगी लग्न झाल्यानंतरही विविध प्रकारे संधी नाकारल्या जाण्यापासून, वाऱ्यावर सोडल्यागत जीवनाला एकाकीपणे सामोरे जाणाऱ्या या महिलांमधून आता कार्यरत व करारी नेतृत्व पुढे येत आहे.

महिला नेतृत्व क्षमता विकास उपक्रमाला मिळणारा वाढता प्रतिसाद आणि त्याचे तळागाळातील गरजू महिलांवर होणारे सकारात्मक परिणाम पाहता, या अभ्यासक्रमाला अधिक व्यापक व परिणामकारक बनविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यानुसार या अभ्यासक्रमाची नव्याने रचना करण्यात आली आहे. त्यानुसार आता महिला नेतृत्व क्षमता विकास अभ्यासक्रमाला महिलांच्या मूलभूत व कायदेशीर हक्कांप्रति जनजागृतीच्या माध्यमातून प्रबोधन करणे, त्याची अंबलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शकांना प्रशिक्षित करणे, महिलांना आपल्या अडचणी व व्यथा मांडण्यासाठी त्यांना संवादविषयक प्रशिक्षण देणे, त्यांना अधिक साक्षर करणे, आर्थिक व्यवहारांची मूलभूत माहिती देणे, महिला सुरक्षाविषयक विविध मुद्द्यांसंदर्भात जागृती करून, त्यानुसार कृती करणे इ. विविध मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे. कधी घरगुती व कौटुंबिक स्तरावर विविध समस्यांना सामोरे जावे लागलेल्या राजस्थानच्या ग्रामीण भागातील टीना रावत यांनी, महिलांपुढे उभ्या ठाकणाऱ्या अत्याचाराच्या समस्यांचा सामना करण्यासाठी जिद्दीने पदवीचे शिक्षण आणि त्यानंतर कायद्यातील पदवी घेतली. आज त्या राज्याच्या विभिन्न भागांत केवळ महिला अत्याचाराप्रकरणीच वकिली करत असून, अशा महिलांना न्यायालयातून त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी कसोशीने प्रयत्न करतात. एका महिलेच्या तक्रारप्रकरणी न्यायनिवाडा करताना स्थानिक न्यायालयाने, टीना रावत यांची जिद्द आणि प्रयत्न म्हणजे घुंघटपासून काळ्या कोटापर्यंतचे मोठे परिवर्तन असल्याचे आवर्जून नमूद केले आहे. 'एकल महिला संघटने'ची स्थापना झाल्यापासून या संघटनेने गेल्या दशकाभरात, महाराष्ट्र व राजस्थानातील सुमारे २५० तालुक्यांपर्यंत आपल्या कामाचा विस्तार केला आहे. या क्षेत्रातून संस्थेने १ हजार, ६०० महिलांना नेतृत्व विकासाचे प्रशिक्षण दिले आहे. याचा लाभ, तीन हजारांहून अधिक गावांमधील गरजू महिलांना मिळाला आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### प्रदूषणाचा भस्मासुर थांबवायला हवा!

स्विस संस्था आयक्यूएआरने जागतिक प्रदूषणावर ११ मार्च २०२५ रोजी एक अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे. कारण या अहवालानुसार जगातील सर्वाधिक प्रदूषित २० शहरांत १३ शहरे भारतातील आहेत. या शहरांत वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्त्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम-विषमसारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केले जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### अपत्यच नको म्हणणे चुकीचे

दोन पिढ्यांचा आचारविचार, आर्थिक बाब यात फरक राहणारच. आमच्या लहानपणी प्रत्येक स्त्रीला आठ दहा मुले राहत. गोकुळ हे संसाराचे भूषण होते. शेती मुख्य व्यवसाय असल्यामुळे खाण्याची कमतरता नव्हती. नणंद-भावजय, दीर-वहिनी, जावा-जावा, सासा-सुना नाते टिकून होते. नात्यांची समृद्धी होती. कुटुंब नियोजनामुळे ४-३-२-१ आता अपत्यच नको म्हणतात. काही जण लग्न करतात, काही रिलेशनशिपमध्ये राहतात. युवा पिढी म्हणते स्पर्धेचे युग आहे. मोलकरीण सुद्धा पंधरा दिवस आली नाही तर आम्ही दुसरी ठेवतो. हेच प्रकार नोकरीत लगेच दुसरा कर्मचारी ठेवतात. पुन्हा नोकरी मिळेलच याची शाश्वती नाही. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती. मुलांमध्ये मुले सहज वाढत. आता विभक्त कुटुंब पद्धती आहे. कुणाच्या भरवशावर मुले ठेवणार? सर्वांनाच आजी, आजोबा असतात किंवा सांभाळतील असे नाही. लहान मुलाला सांभाळण्यासाठी बाई ठेवली तर ती मुलाचे रक्त काढते, त्याचे दूध -जेवण स्वतः घेते, त्यांना झोपवून बाहेर जाते वगैरे प्रकार ऐकतो. त्यामुळे बाई ठेवायला मन धजावत नाही. मुलगा असो व मुलगी त्यांना पळवून नेणे, खंडणी मागणे, गैरवर्तणूक त्यामुळे अपत्य म्हणजे जीवनाला आनंद देणारी गोष्ट नसून काळजीचा विषय वाटतो. मुले नोकरीमुळे लांब राहतात त्यामुळे म्हातारपणीची काठी, आधार म्हणणे चुकीचे आहे. आता मुलांना वंशवृद्धी यापेक्षा करीअर महत्त्वाचे वाटते. त्यामुळे हिंदूंची संख्या कमी होत आहे. काही जाती अल्पसंख्यक होऊं पाहतात. स्वातंत्र्यासाठी, संसारासाठी पाठ फिरविणारी पिढी इतिहासजमा होत आहे. मी, माझे सुख, करीअर, पैसा, समाजात नाव कमावणे थोडक्यात आत्मकेंद्रित जीवन जगण्याकडे कल आहे. मूल म्हणजे प्रेमाचे प्रतीक, संसारातील आनंद न वाटता जीवनातील अडचण घोड वाटते.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

### हिंदू धर्माचे ऐश्वर्य

जगात सध्या सनातन हिंदू धर्माबद्दल प्रचंड चर्चा आणि उत्सुकता जागृत झाली आहे. प्रयागराज येथील १४४ वर्ष म्हणजे दर १२ वर्षांनंतर १ कुंभ असे १२ कुंभ झाल्यानंतर हा योग आला होता म्हणून याला महाकुंभ असे म्हणले जाते. कुंभ काळात ४२ देशांतील तब्बल ६६ कोटी हिंदूंनी पवित्र स्नान करून स्वतःला पावन करून घेतले. मूलतः हिंदू धर्माचे हे ऐश्वर्य दर्शन होते. कारण न भूतो न भविष्यति असा हा श्रद्धा आणि भक्तीचा योग पुन्हा होणे नाही. धर्म हा आस्था आणि आचरणाचा विषय असल्यामुळे आपल्या सनातन धर्मात सवंग जाहिरातीला किंमत नाही. शास्त्र जे सांगते तसेच पालन म्हणजेच सनातन धर्म होय. यावर कारणमीमांसा नाहीच. हजारो वर्षांपासून मास, तिथी आणि योग नुसार धर्मपालन हीच सनातनची विशेषतःआहे. पुरातन काळापासून आपले वेद, उपनिषद, पुराण धर्मग्रंथ, विविध शास्त्र ग्रंथ हे वैभवाचेच आहेत. त्याचा तर अभिमान आहेच. पण या महाकुंभ पवित्र काळात ६६ कोटी भाविकांनी उपस्थिती दर्शवून आपल्या आस्थेवर मोहर उमटविली हे हिंदू धर्माचे वैशिष्ट्य प्रथमच अनुभवले. हिंदू धर्माच्या ऐश्वर्य, वैभवाने व निर्माण झालेल्या धाकाने स्वतःच्याच धर्माला सर्वश्रेष्ठ मानणाऱ्या तथाकथित धर्ममार्तंडाचे डोळे न दिपल्यास नवल ते काय?



**संजय पाठक**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)



हिंदू नुतन वर्ष गुढीपाडव्यानिमित्त श्री कंकालेश्वर येथे संस्कार भारतीच्या वतीने पाण्यावक्षर तरंगत्या रंगमंचावर सुंदर कलेचे सादरीकरण करण्यात आले.

५

(छाया-कृष्णा शिंदे,बीड)

# बळीराजाचे आर्थिक जीवन भाजपच्या केंद्र व राज्यातील सरकारने उध्वस्त केले : वसंत मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१ एप्रिल**

केंद्रात व राज्यात आरएसएसच्या विचारधारेचे भारतीय जनता पार्टीचे सरकार सत्तेवर असून संपूर्णपणे शेतीमालाचे भाव हमीभावा पेक्षा कमी करून शेतकऱ्याला आर्थिक कोंडीत टाकून बळीराजाचे स्वप्न उत्पन्न दुप्पट करण्याचे देखावा करून शेतकरी आर्थिक संकटात अडकविण्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला.



आपल्या देशामध्ये खरीप रब्बीचे शेतातीलाचे उत्पन्न तयार झाले की परदेशातून सर्व प्रकारचा शेतीमाल ठराविक टक्केवारी देणाऱ्या व्यापाऱ्यामार्फत मागून घेऊन संपूर्ण देशातील शेतकऱ्याच्या शेतीमालाचे भाव पाडून शेतकऱ्याचे जीवन उध्वस्त करण्याचा केंद्रात व राज्यातील सरकारचा अजेंडा आहे. शेतीमाल परदेशातून आयात करताना बीजेपीच्या व्यापाऱ्याकडून अमेरिका ब्राझील अर्जेंटिना चीन या देशात सोयाबीनचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर होते. भारत देशातील सोयाबीन ची मागणी व पुरवठा आणि उपभोग या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा परिणाम सोयाबीनच्या कापूस इतर शेतीमालाच्या किंमतीवर होत असतो. सरकारच्या चुकीच्या आयात निर्यात धोरणामुळे शेतीमालाचे भाव नसल्यामुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या चिंताजनक असून संपूर्ण शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यापुढे आर्थिक संकट उभे राहत असल्यामुळे आत्महत्या वाढत आहेत . शेतकऱ्याच्या दैनंदिन कुटुंबाचा खर्च भागवणे अडचणीचे झाले आहे. तरीही केंद्र व राज्य सरकारला काहीही देणे घेणे नाही. एकीकडे शेतीमधील खते बी बियाणे कीटकनाशक औषधी ट्रॅक्टर खर्च खुरपणी फवारणी मळणी यंत्र मजुरी दैनंदिन खर्च वाढल्यामुळे व शेतीमालाला भाव नसल्यामुळे शेती परवडत नाही .उत्पादनातून खर्च निघणे शक्य नाही, त्यामुळे सर्व बाजूने शेतकऱ्याला शासनाने आधार देणे काळाची गरज आहे. शासनाचे बाजारपेठेवर नियंत्रण नाही.

हमीभावापेक्षा कमी भावाने शेतकऱ्याचा शेतीमाल बाजारपेठेतून खरेदी केला जात आहे. शासनाकडून कोणतेही कारवाई केली जात नाही. शासनाकडून आधारभूत किंमत शेतीमालाला मिळत नाही. अतिवृष्टी दुष्काळ पिक विमा विविध योजनांचे अनुदान आज तागायत शेतकऱ्याच्या खात्यात वर्ग केलेले नाहीत. निष्क्रिय केंद्र व राज्यातील सरकार शेतकऱ्याला संपवण्याचे षडयंत्र रचित असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला.

# परळी-पंढरपुर चैत्रवारी पालखी सोहळ्याचे प्रस्थान



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१ एप्रिल**

चैत्र वारी गुढीपाडव्या निमित्त परळी येथुन निघणार्या संत जगमित्र नागा महाराज पालखी दिंडी सोहळ्याचे रविवार दि.३० मार्च रोजी प्रस्थान झाले असुन दि.६ एप्रिल रोजी हा पायी दिंडी सोहळा पंढरपूर येथे पोंहचणार आहे.

परळी येथील वारकरी स्व.सोपान पांडुरंग काळुमाळी यांच्या प्रेरणेतून विठ्ठल काळुमाळी,रमेश काळुमाळी,दिपक काळुमाळी,रामेश्वर काळुमाळी हे परळी ते पंढरपूर चैत्र वारी संत जगमित्र नागा महाराज पालखी सोहळ्याचे आयोजन करत असतात.या पायी दिंडीत परळी व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असतात.रविवार दि.३० मार्च रोजी संत जगमित्र मंदिरात भजन,आरती झाल्यानंतर दुपारी ३.३० वाजता हा दिंडी सोहळा पंढरपुरकडे रवाना झाला.या सोहळ्याचा पहिला मुक्काम गिरवली येथे दि.३० मार्च रोजी झाल्यानंतर दुसरा मुक्काम दि.३१ रोजी गाधवड,तिसरा मुक्काम दि.१ एप्रिल रोजी पळसप,चौथा मुक्काम दि.२ रोजी धाराशिव,पाचवा मुक्काम दि.३ रोजी उंडेगाव,सहावा मुक्काम दि.४ रोजी मोहिते वस्ती अंजनगाव व सातवा मुक्काम दि.५ एप्रिल रोजी रोपळे येथे होणार आहे.दि.६ ते ८ हे दोन दिवस पालखी पंढरपूर येथे मुक्कामी थांबणार असुन दि.९ एप्रिल रोजी पंढरपुर येथुन परतीच्या प्रवासास निघाल्यानंतर दि.२० एप्रिल रोजी या पालखी सोहळ्याचे परळी येथे आगमन होणार आहे.



मराठा सेवा संघ संचालित राष्ट्रमाता जिजाऊ रथयात्रा २०२५ अंतर्गत मराठा जोडो अभियान, आणि शिवसंकल्प अभियान यात्रेचे आज बीड शहरात आगमन झाले.. यावेळी या रथयात्रेचे स्वागत करतांना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे सह संपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे, जिल्हाप्रमुख उल्हास गिराम सह आदी शिवसैनिक

# शाळा, महाविद्यालये ही ज्ञानाची केंद्र आहेत-रानबा गायकवाड

## पी. एमश्री जि. प.के.प्रा.शाळा सिरसाळा येथे व्याख्यान संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**सिरसाळा दि.१ एप्रिल**



जगाच्या पाठीवर शाळा आणि महाविद्यालये ही ज्ञानाची केंद्रे आहेत.ज्ञान हे बाजारात नाही तर पुस्तके आणि विविध ग्रंथातून मिळते. असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक भीमयुगकार रानबा गायकवाड यांनी केले.ते सिरसाळा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत पीएमश्री योजने अंतर्गत आयोजित व्याख्यान प्रसंगी बोलत होते.

दिनांक २८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झालेल्या या व्याख्यान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मधुकर घोडके हे होते उद्घाटक म्हणून अन्वरखा पठाण( अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती ,तर यावेळी गोविंद कराड (जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी परळी) कवी भागवत काचगुंडे रामभाऊ कडबाने हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी भीमयुगकार रानबा गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तीमत्व विकास याविषयी मार्गदर्शन केले. तसेच राज्य सरकार जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना सर्व सुविधा मोफत उपलब्ध करून देते याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.याप्रसंगी मुख्धयापक मधुकर घोडके, विस्तार अधिकारी कराड सर,भागवत काचगुंडे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष अरबूने,विठ्ठल भुजबळ, नारायण जाधव ,महादेव राजमाने, देविदास पवार, लता चोपडे, मनीषाताई सरवदे, मंगल माळी, महानंदा विटेकर, वर्षाराणी पिंपरखेडकर आदींनी परिश्रम घेतले . कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन आणि आभार लक्ष्मण वैराळ यांनी केले.

# इरा पब्लिक स्कूलच्या दोन विद्यार्थ्यांची टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१ एप्रिल**

गेवराई शहरातील इरा पब्लिक स्कूलचे सम्यक निकाळजे व सक्षम प्रधान या विद्यार्थ्यांची गोवा या ठिकाणी होणाऱ्या टि - २० क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील गरवारे स्टेडियमवर टी-२० स्पर्धे च्या निवडीसाठी चाचणी ठेवण्यात आली होती. या चाचणीत इरा पब्लिक स्कूलचे सम्यक निकाळजे व सक्षम प्रधान या विद्यार्थ्यांनी उत्तम प्रदर्शन केले. यामुळे या दोन विद्यार्थ्यांची गोवा येथे होणाऱ्या टि - २० क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना स्ट्रेट ड्राईव्ह क्रिकेट क्लबचे जितू गायकवाड, इरा स्कूलचे अशोक मरळकर, रितेश राठोड यांचे मार्गदर्शन लाभले होते. या यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे अध्यक्ष गणेश क्षीरसागर, प्राचार्या वर्षा क्षीरसागर, क्रीडाशिक्षक प्रशांत शिरसाट आदी उपस्थित होते.



# श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड ते कानिफनाथ गड रोप-वे ला शासनाची मंजुरी

## ना.पंकजाताई मुंडे यांनी मानले केंद्र व राज्य सरकारचे आभार



**रोप-वे मुळे बीड-नगर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला मिळणार चालना**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ एप्रिल**

आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथगड (मायंबा) ते पाथर्डी तालुक्यातील श्री क्षेत्र कानिफनाथगड (मढी) या दरम्यान ३.६ कि.मीच्या रोप-वे प्रकल्पाला राज्य सरकारने मान्यता देवून नाथ भक्तांना सुविधा उपलब्ध करुन दिल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण,वातावरणीय बदल व पशूसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी राज्य व केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

या दोन्ही गडा दरम्यान रोप-वे सुरू करावा यासाठी पाथर्डीचे आमदार मोनिका राजळे यांनी वेळोवेळी पाठपुरावा व प्रयत्न केला होता, त्यांच्या पाठपुराव्या नंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सहकार्याने शासनाच्या राष्ट्रीय रोप-वे कार्यक्रम पर्वतमाला या अंतर्गत मायंबा ते मढी या ३.६ किमीच्या हवाई अंतरामध्ये सदर रोप-वे सुरू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

या प्रकल्पामुळे बीड-नगर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला नवी दिशा मिळणार असुन ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या यामुळे वाढणार आहे. ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या नवीन संधी देखील यामुळे उपलब्ध होतील. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे दोन्ही जिल्ह्यातील पर्यटन आणि दळणवळण क्षेत्राला चांगला फायदा होणार आहे. दरम्यान, हा रोप-वे सुरू करुन नाथ भक्तांना सुविधा उपलब्ध करुन दिल्याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.

# जन शिक्षण संस्थान बीड द्वारा प्रशिक्षिकांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ एप्रिल**



प्रशिक्षण हा व्यक्तीच्या विकासाचा एक महत्त्वाचा भाग आहे. प्रशिक्षणातून नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात व त्याचा परिणाम आपल्या कामाच्या गुणवत्तेवर होतो. यासाठीच कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने संपूर्ण बीड जिल्ह्यातील प्रशिक्षकांसाठी दिनांक २८ मार्च २०२५ रोजी क्षमता बांधणी कार्यशाळा घेण्यात आली. याप्रसंगी जन शिक्षण संस्थानच्या मा. उपाध्यक्ष डॉ. सौ सत्यभामा चोले, नानाजी देशमुख विद्यामंदिर शालेय सचिव डॉ. सौ सीमा जोशी, जन शिक्षण संस्थानचे मा. संचालक श्री गंगाधर जी देशमुख, कार्यक्रम अधिकारी सौ सीमा मणुरकर यांचे मार्गदर्शन झाले.

या कार्यशाळेत प्रशिक्षणातील गुणवत्ता, व कार्यतत्परता आर्थिक साक्षरता, डॉक्युमेंटेशन, प्रवेश रजिस्ट्रेशन, यशोगाथा संकलन इत्यादी विषयावर मार्गदर्शन झाले. या कार्यशाळेसाठी बीड, गेवराई, माजलगाव,पाटोदा, शिरूर, धारूर केज, अंबाजोगाई इत्यादी तालुक्यातून ३९ प्रशिक्षक उपस्थित होते.

# शक्तीचे सर्वोच्च स्वरूप बुध्दी असते- श्री श्री कनकेश्वरी देवी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ एप्रिल**

शक्तीचे सर्वोच्च स्वरूप बुद्धी असते. जर बुद्धी एखाद्या कार्य करण्याचा निर्धार करत असेल, तर ते कार्य निश्चितच पूर्ण होते. परंतु, जेव्हा वृत्ती बुद्धीवर हावी होते, तेव्हा गुन्हेगारी प्रवृत्ती जन्म घेतात. त्यामुळे, उत्तम कार्यांसाठी आवश्यक आहे की बुद्धी वृत्तीच्या वर राहावी, असे विचार श्री श्री १००८ माँ कनकेश्वरी देवीजी यांनी व्यक्त केले.

त्रिशूल नवदुर्गा महोत्सव समिती हिंगोलीच्या वतीने मंगळवारा बाजार परिसरातील श्रीदत्त मंदिरात रविवारी श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सप्ताह सुरू झाला आहे. कथेच्या दुसर्या दिवशी, म्हणजेच सोमवार, दि.३१ मार्च रोजी माँ कनकेश्वरी देवीजी यांनी मार्गदर्शन करतांना म्हटले की, ज्या संकल्पाने एखादी व्यक्ती रामकथेचे श्रवण करते, तो संकल्प लौकिक असो वा अलौकिक, तो नक्कीच पूर्ण होतो. कथा ऐकल्याने मिळणारे विचार जेव्हा बुद्धी स्वीकारते, तेव्हा हळ-हळू वृत्ती देखील त्याच दिशेने प्रवाहित होते. त्यामुळे व्यक्तीच्या जीवनात सकारात्मक बदल होतात.

माँ कनकेश्वरी देवीजी यांनी सद्गुरू आणि त्यांच्या कृपेच्या विषयावर सांगितले की, जागतिक स्तरावरील कार्ये पूर्ण करण्यासाठी मानवाला सद्गुरू, परमतत्त्व किंवा ईश्वरी सत्ता यांची आज्ञा आवश्यक असते. जेव्हा तन आणि मन सात्त्विक असतात, तेव्हा परमचेतना व्यक्तीला इतकी शक्ती प्रदान करते की तो जागतिक स्तरावर कार्य करू शकतो. सद्गुरू जेव्हा एखाद्या कार्याची आज्ञा देतात, तेव्हा ते ते पूर्ण करण्याची शक्तीही प्रदान करतात. त्यामुळे, त्यांच्या आज्ञेचे सहर्ष पालन करायला हवे. माँ कनकेश्वरी देवीजी पुढे म्हणाल्या की, गुरुत्वाचे खरे स्वरूप असे आहे की ते सर्वांना समान दृष्टीने पाहते आणि सर्वांना आपलेसे करते. गुरुत्वाच्या मर्यादेचे ज्ञान मिळालेल्या व्यक्तीस परमतत्त्वाची निकटता प्राप्त होते. ज्या महापुरुषांनी अंतर्गत स्थिरता प्राप्त केली आहे, त्यांनाच ईश्वरी आनंदाचा अनुभव घेता येतो.

सद्गुरू वचन आणि साधनेचे महत्त्व स्पष्ट करताना माँ कनकेश्वरी देवीजी म्हणाल्या की, गुरुंच्या प्रत्येक वचनाला तारक मंत्र मानले पाहिजे. सद्गुरूचे सत्संग भगवंतामध्ये अनुराग निर्माण करतात, त्यामुळे व्यक्ती सांसारिक आसक्तीपासून मुक्त होऊन ईश्वरी प्रेमामध्ये लीन होते. सद्गुरूंची वचने जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्त होण्यास मदत करतात.

माँ कनकेश्वरी देवीजी यांनी असेही सांगितले की, साधनेचा मूलाधार ध्यान, चिंतन आणि जप असतो. ध्यान नेहमी गुरुंच्या चरणांचे असावे, चिंतन त्यांच्या गुणांचे आणि जप त्यांच्या मंत्रांचे. यामुळे साधकाच्या जीवनात आध्यात्मिक उन्नती होते. प्रत्येक माणसाने आपल्या जीवनात उत्तम कार्य करावे, दुसर्यांना मदतीसाठी सदैव पुढे असावे. जीवन एकदाच मिळते, त्यामुळे जोपर्यंत आपण जिवंत आहोत, तोपर्यंत हसत-खेळत आणि इतरांना मदत करत राहावे. श्रीराम कथा ज्ञानयज्ञाच्या या पवित्र आयोजनात भक्तांनी श्रद्धापूर्वक कथा श्रवण केली आणि माँ कनकेश्वरी देवीजींच्या अमृतमय वचनांनी लाभ घेतला. या दिव्य प्रसंगाने भक्तांच्या हृदयात आध्यात्मिक चेतना जागृत केली आणि जीवनात मर्यादा, गुरुत्व आणि ईश्वरी भक्तीचे महत्त्व अधोरेखित केले. श्रीराम कथेच्या दुसर्या दिवशी सुरुवातीला माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, व त्रिशुल नवदुर्गा महोत्सव समितीचे सदस्य श्याम खंडेलवाल यांनी सपत्नीक माँ कनकेश्वरी देवीजींचा सत्कार केला. दैनंदिन यजमान ताराचंदजी घेवरचंदजी धुत हे होते. तर कथेनंतर महाप्रसादचे सोमवारचे यजमान एम.टी.वर्मा हे होते. यावेळी कथा श्रवणासाठी हजारो भाविक भक्त मोठया संख्येने उपस्थित होते. यशस्वीतेसाठी श्री त्रिशुल नवदुर्गा महोत्सव समितीच्या पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# सिध्देश्वरच्या पंप हाऊसला आग, केबल जळाला

## शहराचा पाणीपूरवठा होणार विस्कळीत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ एप्रिल**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सिध्द-ेश्वर धरणाजवळील पंप हाऊसच्या केबलला मंगळवारी पहाटे आग लागून संपूर्ण केबल जळून खाक झाले आहे. यामध्ये केबलचे सुमारे ४ ते ५ लाख रूपये नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. यामुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. केगलची पाहणी करून नवीन केबल टाकण्याचे काम हाती घेतले जाणार असल्याचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी सांगितले.

हिंगोली शहराला सिध्देश्वर धरणातून पाणी पुरवठा केल्या जातो. त्यासाठी धरणावर पंप हाऊस उभारण्यात आले असून तसेच डिग्रस कऱ्हाळे परिसरात जल शुध्दीकरण केंद्र उभारण्यात आले आहे. धरणातून उपसा केलेले पाणी जल शुध्दीकरण केंद्रावरून शुध्द करून त्यानंतर शहराला पाणी पुरवठा केला जातो. शहरातील सर्व १७ प्रभागांमध्ये पाणी वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे. या नियोजनानुसारच प्रभागांना एक ते दोन दिवसाआड पाणी पुरवठा केल्या जात आहे.

दरम्यान, मंगळवारी पहाटे सिध्देश्वर धरणावरील पंप हाऊसच्या केबलला आग लागली. या आगीची माहीती मिळताच नगर पालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे, अभियंता वसंत पुतळे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी भेट दिली. अग्नीशमन दलाचे आग विझवली असून यामध्ये केबल जळाल्याचे समोर आले आहे. केबल जळाल्यामुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. नगर पालिकेने तातडीने केबल मागवून वीज पुरवठा सुरळीत करून पाणी पुरवठा सुरळीत करण्याचे काम युध्द पातळीवर सुरू करण्यात आले आहेत. तोपर्यंत नागरिकांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहन मुख्याधिकारी मुंढे यांनी केले आहे.

# जान्हवी घुगेला इंटरनॅशनल बुक ऑफ रेकार्ड स्थान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ एप्रिल**

जान्हवी नितीनकुमार घुगे ही विद्यार्थिनी, पोद्दार अंतरराष्ट्रीय विद्यालय, मध्ये ई.आठवीं मध्ये शिकत आहे. शैक्षणिक व्हीडिओ या श्रेणीमध्ये मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत तब्बल ७२ व्हीडिओ स्वतः तयार करून यू ट्यूबवर अपलोड केल्याबद्दल इंटरनेशनल बुक ऑफ रिकॉर्ड या संस्थे मध्ये तिची नोंद घेण्यात आली. या पूर्वी इंडिया बुक ऑफ रिकॉर्ड या संस्थे मध्ये सन २०२२-२३ मध्ये जान्हवी ने स्थान मिळवले होते. तिच्या या यशाबद्दल हिंगोलीचे जिल्हाधिकारी श्री अभिनव गोयल यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. मुली, डॉक्टर- इंजीनियर या क्षेत्रा सोबतच विविध क्षेत्रांमध्ये उज्वल भवितव्य घडवत आहेत. तसेच जिद्द व परिश्रम करण्याची तयारी असल्यास विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही क्षेत्रामध्ये यश मिळवणे अवघड नाही असे मोलाचे मार्गदर्शन जिल्हाधिकारी गोयल यांनी केले. जान्हवीच्या यशाबद्दल आई वडील, नातेवाईक व मित्र परिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



**हिंगोली- जिल्हा परिषदेच्या नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी मंगळवारी जिल्हा परिषदेचा पदभार स्विकारला. यावेळी उपमुखय कार्यकारी अधिकारी अनंतकुमार कुंभार यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ, शिक्षणाधिकारी दिग्रसकर, शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्के यांचेसह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### शिरड शहापूर यैथे रमजान ईद उत्साहात साजरी



हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यातील शिरड शहापूर येथे ३१ मार्च रोजी सोमवारी ईद-उल-फित्र रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली. रमजान महिन्यातील एक महिन्याच्या रोजा उपवासानंतर ईद उत्साह साजरी करण्यात आली. ३१ मार्च रोजी सकाळी नऊ वाजता ईदगाहा मैदान येथे समुदायिक नमाज पठण करण्यात आले ,यावेळी मौलाना शहादत यांनी मार्गदर्शन केले तर मौलाना शाहआलम यांनी नमाज पठण केले तर मौलाना सोहेल यांनी खुदबा दिला. यावेळी जागतिक शांतता व स्थैर्यासाठी प्रार्थना करण्यात आली. नमाजनंतर सर्वांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या व त्यानंतर ईदी स्पेशल शिरखुरमासाठी एकमेकांना निमंत्रण देण्यात आले. रमजान ईदला हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक म्हणून पाहिले जाते.

### हट्टा येथे शिवपुराण कथेचे आयोजन




हिंगोली- वसमत तालुक्यातील श्री सिध्देश्वर संस्थान हट्टा येथे दिनांक २ ते ८ एप्रिल २०२५ रोजी संगीतमय श्री शिवमहापूराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या शिव महापुराण कथेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही कथा आचार्य सत्यनारायणजी व्यास यांच्या मधुर वाणीतून होणार आहे. ही कथा संगीतमय असल्याने कथेची वेळ सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत होणार आहे. दरम्यान सिद्धेश्वर संस्थान येथे लघुरुद्र अभिषेक आठवडाभर करण्यात येणार आहेत. तसेच बुधवार दिनांक ९ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत ह.भ.प. शरद अंबेकर यांचे काल्याचे किर्तनानंतर महाप्रसाद कार्यक्रम होणार आहे. पंचक्रोशीतील भक्तांनी कथा श्रवणाचा लाभ घेण्याचे आवाहन हट्टेकर ग्रामस्थांनी केले आहे.

# महिलेच्या गळ्यातील मंगळसुत्र चोरीचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ एप्रिल**

वसमत येथे बालाजी नगर भागात रविवारी पहाटे सात वाजण्याच्या सुमारास घरासमोर झाडझुड करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील मंगळसुत्र पळविण्यावा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. घटनास्थळी पोलिस दाखल झाले असून दुचाकीवरील तीन चोरट्यांचा शोध सुरू करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार वसमत शहरातील बालाजी नगर भागात पुष्पाबाई अवचार यांचे घर आहे. सकाळी सात वाजण्याच्या सुमारास त्या घरासमोरील अंगणात झाडझुड करीत होत्या. यावेळी दुचाकीवर आलेल्या तिघांनी त्यांच्या गळ्यातील मंगळसुत्र ओढले. मात्र चोरट्यांना मंगळसुत्र तुटलेच नाही. प्रसंगावधान राखत पुष्पाबाई यांनी आरडाओरड सुरू केली. त्यानंतर त्यांचा आवाज ऐकून परिसरातील नागरिक मदतीसाठी धाऊन आले. मात्र नागरिक येत असल्याचे लक्षात येताच चोरट्यांनी धुम ठोकली. या घटनेची माहीती मिळाल्यानंतर वसमत पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुधीर वाघ, उपनिरीक्षक शिवाजी बोंडले, जमादार काशिनाथ भोपे, प्रशांत मुंढे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी परिसरात माहीती घेतली. त्यानंतर काही ठिकाणी सीसीटीव्ही फुटेज तपासणी केली असता एका दुचाकीवर तिघेजण आल्याचे दिसून आले. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेऊन त्यावरून चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

# वाढत्या लोकसंख्येमुळे मालवाडी ग्रामपंचातीअंतर्गत नागरिक सुविधापासून वंचीत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ एप्रिल**

शहरानजीक असलेल्या मालवाडी ग्रामपंचायतीची संख्या सुमारे नऊ हजार एवढी झाली आहे. ग्रामपंचातीचे उत्पन्न लाखोंच्या घरात असूनही येथील नागरिकांना मुलभूत सुविधा मिळत नाहीत. याकडे गांभीर्याने लक्ष घालून नागरिकांना मुलभूत सुविधा पुरवण्यात याव्यात अशी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शहराला लागून असलेल्या मालवाडी ग्रामपंचातीचा मागील दहा वर्षात विस्तार होत असून सुराणा नगर,चिखलवाडी आणि मालवाडी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरिकांनी बांधकामे केली आहेत. दिवसेंदिवस या भागातील नागरिकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. सुमारे नऊ हजाराच्या जवळपास लोकसख्या असूनही या गावात दोनच आशा वर्कर कार्यरत आहेत. नव्याने तीन आशा वर्करची आवश्यकता आहे. आशा वर्कर अभावी महिला व बालकांचे आरोग्य, वयोवृध्द नागरिक शासनाच्या योजनेपासून दुर्लक्षीत राहत आहेत. या ग्रामपंचातील दरवर्षी १० लाखांचे उत्पन्न होत आहे शिवाय घरपट्टी आणि नळपट्टीचे सुमारे ७ ते आठ लाख रूपये उत्पन्न मिळत आहे. परंतु नागरिकांना शासनाच्या योजनांपासून तसेच सुविधांपासून वंचीत रहावे लागत आहे. मागील अनेक वर्षापासून या ग्रामपंचातीत वास्तव्य करणाऱ्या रहीवाशांना रस्ते, नाली, विद्युत पुरवठा अशा मुलभूत सुविधाही उपलब्ध होत नसल्यामुळे रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. दुसरीकडे ग्रामपंचायत घरपट्टी आणि नळपट्टी सक्तीने वसूल करीत आहे. लाखोंचे उत्पन्न असूनही या ग्रामपंचायती अंतर्गत रहीवाशांना सुविधापासून वंचीत रहावे लागत आहे. यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करून नागरिकांना सुविधा आणि योजनांचा लाभ मिळवून द्यावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर अभिजीत पाटील यांची स्वाक्षरी आहे.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वर्ष प्रतिपदा उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ एप्रिल**

दरवर्षी प्रमाणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंगोली शहराच्या वतीने वर्ष प्रतिपदा उत्सव मोठ्या आनंदाच्या वातवारणात साजरा करण्यात आला.

रविवार ३० मार्च रोजी गुढीपाडवा दिनानिमित्त हिंगोली शहरातील तापडीया इस्टेट एनटीसी परीसरातील महावीर उद्यानात राष्ट्रीय स्वयंसवेक संघातर्फे वर्ष प्रतिपदा उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी असंख्य गणवेशधारी स्वयंसेवक तसेच शहरातील नागरीक, महिला आर्वजून उपस्थित होत्या. सायंकाळी ५. ३० वाजता कार्यक्रम सुरू झाला. सर्वप्रथम सर्व स्वयंसेवकांनी आद्य सरसंघचालक यांना प्रणाम दिला. त्यानंतर ध्वजारोहन करण्यात आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने वर्षभरात ६ उत्सव साजरे केले जातात. त्यामुळे हा नवीन वर्षाचा पहीला उत्सव या दिवशी स्वयंसेवकास नवीन वर्षात करण्याचे कार्याचा संकल्पाचा दिवस असून संघात हा उत्सव का साजरा केल्या जातो. व तो कसा स्वयंसेवकास उर्जा, स्फूर्ती देणारा आहे. या उत्सवातील बौध्दीकात असलेले वक्ते परभणी विभागाचे सहकार्यवाह उपेंद्र श्रीधरराव कौऊडगावकर यांनी सांगितले. तर जिल्हा संघचालक तेजकुमार झांझरी यांनी हिंगोली जिल्हा कार्यकारीणीची घोषणा केली.

तर प्रमुख पाहूणे आर्ट ऑफ लिव्हींगचे प्रशिक्षक गजानन मनोहरराव पोपळाईतकर यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना संघ हा शासक आणि अनुशासक निर्माण करतो असे सांगितले.

यावेळी ध्वजप्रणाम, प्रार्थनेनंतर कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमात आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# राष्ट्रवादीचे सदस्य नोंदणी अभियान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ एप्रिल**

हिंगोली लोकसभा क्षेत्रातील कळमनुरी तालुका राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी सदस्य नोंदणी अभियान, पक्ष प्रवेश आणि पद नियुक्ती बैठक संपन्न झाली

यावेळी दिव्यांग सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष रामदास पाटील सुमठाणकरयांनी आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती तसेच नगरपालिका निवडणुकी संदर्भात तसेच सदस्य नोंदणी जिल्हाभरात कशी जास्तीत जास्त करता येईल व गाव तिथे शाखा घर तिथे राष्ट्रवादीचा कार्यकर्ता तयार करण्यासाठी सूचना दिल्या. संघटनात्मक मागदर्शन केले व पदाधिकारी नियुक्ती पत्र व पक्ष प्रवेश पार पडला.

यावेळी आमदार राजू नवघरे, जिल्हाध्यक्ष बि.डी. भाऊ बांगर, तालुकाध्यक्ष विजयराव गावंडे, युवक जिल्हाध्यक्ष आदित्य आहेर, त्रंबक कदम, आशीर्वाद इंगोले, डॉ वसंतराव पतंगे, बाजीराव सवंडकर, शिवाजीराव शिंदे, संतोष आमले आदीसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आ. राजु नवधरे यांच्या नेतृत्वात अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

# परिसीमन प्रक्रियेच्या बळावर अनेकांचे होणार राजकीय सीमोल्लंघन !

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०१ एप्रिल**

राज्यातील मतदारसंघासाठीची परिसिमन प्रक्रीया २०२६ पासून सुरू होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रात लोकसभेच्या आणि विधानसभा च्या जागा वाढणार आहे. त्यातच विधानसभेचे सीमांकन व आरक्षण देखील बदल होऊन देगलूर विधानसभा खुली होण्याची शक्यता असल्याने आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने जवळपास सर्वच पक्षांनी आतापासून जोरदार तयारी सुरू केली आहे.

परिसिमन प्रक्रीयेच्या अनुषंगाने खा. अजित गोपछडे, मीनल पाटील खतगावकर हे आघाडीवर असून आतापासून त्यांनी मुखेड व देगलूरमध्ये संपर्क वाढविण्यास सुरूवात केली आहे. खा. अशोक चव्हाण हे देखील याकडे लक्ष देवून आहेत. विशेष म्हणजे मुखेड व देगलूरमध्ये भाजपाकडे अनेक दिग्गज नेते आहेत. राष्ट्रवादीकडून मिनल खतगावकर तर काँग्रेसकडे तुर्तास तरी कुणी दिसत नाही. त्यातच या मतदारसंघातील लिंगायत बंजारा,

**खा. अशोक चव्हाण व आ. प्रताप पाटलांची भुमिका ठरणार निर्णायक!**

हटकर, मनेरवारलू समाज मोठ्या संख्येने असून हा समाज सध्यातरी भारतीय जनता पार्टीच्या बाजूने आहे. त्यामुळे या ठिकाणी उमेदवार देताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष देखील चाचपणी करूनच उतरण्याची शक्यता आहे. भाजपाकडे लिंगायत लॉबी सक्षम असलयाने ही लॉबी वळविण्यासाठी हिंगोलीतून तयारी करत असलेल्या रामदास पाटील सुमठाणकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस आयात करण्याची शक्यता नाकारता येत नाही. रामदास पाटील यांचा देगलूर व मुखेड मध्ये दांडगा जनसंपर्क आहे, शिवाय सर्व जातींचे तरुण फळी सोबत आहे. त्यामुळे ऐनवेळी ही खेळी देखील खेळली जाऊ शकते. परंतू खा. अशोक चव्हाण यांनी भूमिका जाहीर केल्यानंतरच आ.प्रताप पाटील चिखलीकर हे कुणाला ताकद देतील हे महत्वाचे ठरणार आहे. सध्यातरी राष्ट्रवादी काँग्रेसला दलित, मुस्लिम मतांचा फायदा होण्याचे दिसत असले तरी खा. अशोक चव्हाण हे वेगळा गट निर्माण करूण राष्ट्रवादीला शह देण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसला मुखेड-देगलूरमध्ये अद्याप तरी म्हणावे तसे यश मिळाले नाही. हटकर, धनगर, लिंगायत, कोळी, गोलेवार, बंजारा,पद्मशाली समाज अजुनही आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्याकडे वळला नसल्याने या समाजाला वळविण्यासाठी आ. प्रताप पाटील चिखलीकर काय खेळी खेळतील याकडे देखील अनेकांचे लक्ष लागले आहे. तर दुसरीकडे मात्र भाजपचे खा. अजित गोपछडे आणि राष्ट्रवादीच्या मिनल खतगावकर यांनी जोरदार तयारी सुरू करत मतदारसंघात जनसंपर्क वाढविला आहे. तर गोपचेडे लिंगायत समाजाला गोंजरताना दिसत आहेत.

राष्ट्रवादीला जिल्ह्यात बळकटी देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार हे एका महिना भराच्या कालावधीत नांदेड दोन वेळा आले. एक सभा शहरात तर दुसरी नरसी येथे झाली. त्यामुळे ' एकाच महिन्यात दादा नांदेडात दोनदा, काय आहे इरादा 'अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

## महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना
# पहिला लकी ड्रॉ ७ एप्रिलला

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०१ एप्रिल**

महावितरणच्या लकी डिजिटल ग्राहक योजनेचा पहिला लकी ड्रा ऑनलाईन पध्दतीने दि. ७ एप्रिल २०२५ रोजी काढण्यात येणार आहे. यातून प्रत्येक उपविभाग स्तरावर एक प्रमाणे पहिल्या क्रमांकाकरिता ६५१ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन बक्षिस म्हणून दिला जाणार आहे. तर प्रत्येक उपविभागात प्रत्येकी दोन प्रमाणे दुसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन व प्रत्येकी दोन प्रमाणे तिसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट वॉच बक्षिस म्हणून दिले जाणार आहे. यापुढील लकी ड्रा मे व जून २०२५ या महिन्यात काढण्यात येणार आहेत.

महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत.

१ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे. ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू (एल टी- लाईव्ह) वीजग्राहकांसाठी लागू असून, ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही. अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळास www. mahadiscom.in भेट द्यावी.

ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल पची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ग्राहकांना देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीज बिल भरणा सूट दिली जाते. परिणामी सध्या राज्यात ७० टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### विद्यापीठाच्या राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेत सोलापूरचा जैद शेख प्रथम

**नांदेड**-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सव व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेला गोव्यासह राज्यातील विविध विद्यापीठातील महाविद्यालयांमधून आलेल्या ७३ विद्यार्थ्यांनी या काव्यवाचन स्पर्धेत सहभाग घेवून विविध विषयांवरील दर्जेदार कवितांचे सादरीकरण केले. या काव्यवाचन स्पर्धेमध्ये सोलापूर विद्यापीठातील संगमेश्वर महाविद्यालय सोलापूर येथील जैद अब्दुल हसन शेख हा विद्यार्थी प्रथम पारितोषिकाचा मानकरी ठरला. त्यांचा ११००० रू, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. अशोक महाजन व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तर डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, धाराशिव येथील श्रुती जाधव ही उपविजेता ठरली. तिला ७००० रू. प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यशवंत महाविद्यालय नांदेड येथील कु. मोरे रुद्राणी बालाजीराव ही सर्व तृतीय ठरली. ५००० रू. व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. अनुक्रमे १) भाग्यलक्ष्मी क्षीरसागर (फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे), २) सुरेश देवशेटट्टे (महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड), ३) संस्कृती काळे (श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद), ४) अजिंक्य शेळके (संभाजी कॉलेज ऑफ फार्मसी), ५) कार्तिक दराडे (पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर) या पाच स्पर्धकांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. प्रत्येकी १००० रू. स्मृतिचिन्ह देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र, गोवा येथून विविध विद्यापीठातील महाविद्यालयातून आलेल्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील आपल्या स्वरचित कविता सादर करून उपस्थित रसिकांची मने जिंकली. यामध्ये सामाजिक जाणिवेच्या कविता, प्रेम कविता, स्त्रीच्या सत्वाच्या आणि तिच्या अस्तित्वाच्या कविता, कौटुंबिक भावदर्शन घडविणाऱ्या कविता, राष्ट्र प्रेमाने ओतप्रोत भरलेल्या कविता, कृषी जाणिवांची अभिव्यक्ती करणाऱ्या कविता, व्यवस्थेवर आसूड ओढणाऱ्या विद्रोही कविता अशा वेगवेगळ्या ज्वलंत विषयांवरील कविता सादर करून उपस्थित बहुसंख्य रसिकांची दाद मिळविली व खऱ्या अर्थाने राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेला एका वेगळ्या उंचीवर नेण्याचं काम या स्पर्धक विद्यार्थ्यांनी केले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र- कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. हनुमंत कंधारकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम.के. पाटील, अधिसभा सदस्य ॲड. युवराज पाटील, शिवाजी चांदणे, विद्यार्थी विकास मंडळाचे सदस्य डॉ. सुनील व्यवहारे आदीनी विजेत्या स्पर्धकांचे भरभरून कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेचे आयोजक विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव यांनी प्रास्ताविक केले तर बहारदार सूत्रसंचालन स्पर्धा संयोजक डॉ. अविनाश कदम यांनी केले. विद्यार्थी विकास मंडळाचे सदस्य डॉ. ज्ञानदेव राऊत यांनी मान्यवर व उपस्थितांचे आभार मानले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी डॉ. संदीप काळे, डॉ. पांडुरंग पांचाळ, डॉ. कैलास पुपलवाड व विद्यार्थी विकास विभागाचे कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

### लोकशाही दिनाचे सोमवारी आयोजन

**नांदेड**-सामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी न्याय व तत्परतेने सोडविण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. जिल्हा प्रशासनाच्यावतीने लोकशाही दिन सोमवार ७ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे आयोजित केला आहे. या दिवशी महसूल, गृह, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पाटबंधारे, बांधकाम, परिवहन, सहकार, कृषि विभाग व जिल्हा पाणी पुरवठा समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाचे लोकशाही दिनात प्रलंबीत प्रकरणे आहेत असे अधिकारी बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उपस्थित राहतील. सकाळी १२ वाजेपासून निवेदनाची नोंदणी सुरु होणार आहे. त्यानंतर लगेचच प्राप्त झालेल्या अर्जावर, निवेदनावर म्हणणे ऐकून घेण्याच्या कामास सुरुवात करण्यात येईल. लोकशाही दिनाच्या दिवशी प्राप्त होणाऱ्या जनतेच्या तक्रारी, अडचणी एकत्रीतरीत्या समजावून घेऊन त्या शक्य तितक्या लवकर सोडविण्यात येतील, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी दिली आहे.

### सलीम पिंजारी यांच्यावतीने शिवनाम सप्ताहात महाप्रसाद वाटप

**आदमपूर**-समाजात धार्मिकतेच्या संदर्भात अनेक समाजविघातक बाबी प्रसंगानुरूप उद्धवत असतात. त्याचे दुष्परिणाम समाजातील सर्वच धर्मातील लोकांना भोगावे लागतात.अनेक दलांच्या धार्मिकतेच्या अवाहनाला गाव परिसरातील तरूण,माणसे गुरफटून जात आहेत. अशातच बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथे रमज़ान ईद आणि सर्वधर्मीय अखंड शिवनाम सप्ताहात हिंदू-मुस्लिम एकतेचे दर्शन घडले आहे. गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर गावात शिवनाम सप्ताहास प्रारंभ झाले आहे.

## शेखर चिंचोलकर मंडळ अध्यक्षपदाच्या शर्यतीत आघाडीवर

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.०१ एप्रिल**



भारतीय जनता पक्षाच्या नवीन कार्यकारिणीच्या संरचनेत किनवट उत्तर मंडळ अध्यक्षपदासाठी ओबीसी आघाडीचे माजी तालुका अध्यक्ष शेखर चिंचोलकर हे सर्वाधिक प्रबळ उमेदवार मानले जात आहेत. पक्षाच्या कार्यपद्धती आणि पदाधिकारी निवडीसाठी ठरविण्यात आलेल्या निकषांमध्ये ते पूर्णपणे पात्र ठरत असून, आमदार भिमराव केराम यांचे ते निकटवर्तीय असल्याने त्यांच्या निवडीच्या शक्यता अधिक मजबूत झाल्या आहेत.

शेखर चिंचोलकर यांचे राजकीय अनुभव, वय, जातीय समीकरण तसेच पक्षाच्या धोरणांशी असलेली त्यांची निष्ठा यामुळे ते या पदासाठी सर्वसंमतीने योग्य उमेदवार म्हणून समोर आले आहेत. पक्षाच्या धोरणांशी सुसंगत राहून त्यांनी यापूर्वी ओबीसी आघाडीच्या माध्यमातून कार्यरत राहून पक्षसंघटना बळकट करण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांचे संघटन कौशल्य, प्रभावी नेतृत्व, आणि पक्षकार्यकर्त्यांमध्ये त्यांची लोकप्रियता यामुळे किनवट उत्तर मंडळ अध्यक्षपदासाठी त्यांना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आहे.

भाजपाने तालुका आणि जिल्हा पातळीवरील संघटनात्मक बांधणीसाठी नवीन कार्यकारिणी रचण्याचे धोरण आखले असून, त्याअंतर्गत मंडळ अध्यक्षांच्या निवडीसाठी योग्य व तडफदार नेत्यांची नियुक्ती केली जाणार आहे. यामध्ये शेखर चिंचोलकर यांची दावेदारी मजबूत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली किनवट उत्तर मंडळ अधिक सशक्त होईल, अशी अपेक्षा पक्ष कार्यकर्त्यांमध्ये आहे.

भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांशी त्यांचे असलेले चांगले संबंध, उपलब्ध संसाधनांची भरपूर उभारणी आणि कार्यकर्त्यांमध्ये असलेली त्यांची पकड यामुळे ते पक्षसंघटनेसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत. आगामी काळात पक्षाच्या निर्णयानुसार त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे.

## महिला सक्षमीकरण काळाची गरज : ॲड. सुरेखा पवार

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि.०१ एप्रिल**



तालुक्यातील पंचायत समिती येथील सभागृहात कार्यशाळा व कायदेविषयक मार्गदर्शन आयोजीत करण्यात आले होते. महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत यशोदीप लोक संचालित संधान केंद्र देगलूर अंतर्गत बचत गटांना व मा.वि.म मित्र मंडळ यांना स्त्री पुरुष समानता, कायदे विषयक मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन ॲड. सुरेखा विशाल पवार यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रम उदघाटन प्रसंगी गटविकास अधिकारी शेखर देशमुख, पत्रकार संघटनेच्या राज्य उपाध्यक्ष विशाल पवार भिमराव दिपके, सविता हनेगावे आदी प्रमुख उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाप्रसंगी ॲड. सुरेखा पवार उपस्थिताना मार्गदर्शन केले. महिलांना सक्षम करणाऱ्या विविध कायद्याविषयक ,विविध शासकीय योजनांबाबत तसेच वैकल्पिक वाद निवारण पद्धती व त्याचे फायदे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कोणालाही कायदेविषक मार्गदर्शन किंवा सल्लूयाची आवश्यकता असल्यास मी सदैव आपल्या सेवेत असेन असे ॲड.पवार म्हणाल्या. त्याच प्रमाणे महिला लाभ घेत असलेल्या योजने चे केवायसी आवश्यक वेळी करण्याबाबत आणि महिलांनी विविध शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरता जास्तीत जास्त पात्र महिलांनी सहभाग वाढविण्याबाबत आवाहन गटविकास अधिकारी शेखर देशमुख यांनी केले. स्त्री पुरुष सामानता बाबत बोलताना विशाल पवार म्हणाले कि संसाराचे दोन चाक म्हणजे स्त्री आणि पुरुष हे आहेत. असे असताना सामंज्यस्य पणाने हे ओढलं पाहिजे, ज्योतीबा फुले नी स्त्री भेद विसरून सावित्री बाई फुले ना शिक्षण देऊन पुढे आणले स्त्री शिक्षण दिले व समाज घडवला. जिजाऊ नी शिवबा घडविला असे मोलाचे संदेश त्यानी दिले. महिलांनी स्वतःच्या पायावर उभा राहण्यासाठी शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ घेतला पाहिजे आणि स्वावलंबी जीवन जगले पाहिजे यासाठी त्यांनी महिला व आर्थिक विकास महामंडळाच्या योजनेचा लाभ घेतला पाहिजे असे प्रा. भीमराव दीपके म्हणाले.

या प्रसंगी गटविकास अधिकारी शेखर देशमुख, ॲड. सुरेखा पवार, पत्रकार संघाचे राज्य उपाध्यक्ष अध्यक्षविशाल पवार, प्रा.भीमराव दीपके, सविता हणेगावे, मॅनेजर सुभाष चव्हाण, सह्योगीनी निकिता तलवारे, नगमनी घाटे, पौर्णिमा वाघमारे, समाज सेविका सिंधुताई कांबळे व गावस्तरीय सीआरपी व माविम मित्रमंडळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व नियोजन मॅनेजर सुभाष चव्हाण यांनी केले तर आभार नागमनी घाटे यांनी मांडले.

## मिशन लक्ष्यवेध अंतर्गत ७ एप्रिलपर्यत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०१ एप्रिल**

मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवडण्यात आलेल्या थलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग, हॉकी, लॉनटेनिस, रोईंग, शुटींग, सेलींग, टेबलटेनिस, वेटलिफटींग, कुस्ती या १२ क्रीडा प्रकारांच्या राज्यातील उत्तम खेळाडू निर्माण करणाऱ्या खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य देऊन अश्या संस्थाचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे.

इच्छुक संस्थानी अधिक माहिती व अर्जाच्या नमुन्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, इनडोअर हॉल, नांदेड येथे क्रीडा अधिकारी विपुल दापके यांचा मो.क्र. ९५११७२४०९५,९८६०५२१५३४ यांचेशी संपर्क साधावा. हा अर्ज ७ एप्रिल, २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत आवश्यक कागदपत्रासह परीपुर्ण भरुन द्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे. राज्यातील खेळाडूंनी ऑलिंम्पिक सारख्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदके संपादित करण्यासाठी नियोजनबध्द प्रयत्न होणे गरजेचे आहे. राज्यातील खेळाडूंसाठी अद्यावत क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडा विषयक पायाभुत सुविधा, क्रीडा वेधकशास्त्र, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, खेळाडूंना पुरस्कार व प्रोत्साहन, खेळाडूसाठी करीअर मार्गदर्शन व खेळाडूंच्या क्षमता विकासासाठी देशी, विदेशी प्रशिक्षक व संस्थाचा सहयोग हे सर्व घटक विकसित करण्याच्या उददेशाने महाराष्ट्र शासनाने मिशन लक्ष्यवेध या महत्वकांक्षी योजनेची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

## जिल्ह्यात विजेच्या कडकडाटासह पाऊस

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०१ एप्रिल**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार २ व ३ एप्रिल २०२५ हे दोन दिवसासाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. या दोन दिवसांच्या काळात जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका व मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा व नागरिकांनी काळजी घ्यावी असे, आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने केले आहे.





**नांदेड-स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एटीएम मशीन चोरी करणाऱ्या अंतरराज्यीय टोळी जेरबंद केली असून त्यांच्याकडून एटीएम चोरीतील नगदी १ लाख २२ हजार रुपये व गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोउपनि साईनाथ पुय्यड, नागनाथ तुकडे, मिलींद सोनकांबळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.**

## मुदखेड शहरात ईद-उल-फित्र उत्साहात

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.०१ एप्रिल**

रमजान पवित्र महिन्याची सांगता ईद -उल -फित्रने उत्साहात साजरी करण्यात आली आहे. ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवानी सामूहिक नमाज पठण करत दुआ अदा केली. हिंदू मुस्लिम बांधवानी शीरखुर्माचा स्वाद घेत भाईचारा जोपासला आहे.

रमजान ईदनिमित्त दि. ३१ मार्च रोजी शहरातील ईदगाह मैदानावर देशात समृद्धी व सामाजिक एकात्मता आबादीत राखण्यासाठी अल्लाहकडे प्रार्थना करण्यात आली आहे. हाफिज मेहराऊल हसन यांनी नमाज अदा केली. तालुक्यातील बारड, पार्डी, शेम्बोली, निवघा, मेंढका आदी गावात मुस्लिम व हिंदू बांधवानी एकमेकास अलीगण देऊन शुभेच्छा दिल्या. खासदार रवींद्र चव्हाण यांनी रमजान ईदनिमित्त काँग्रेस कार्याध्यक्ष मोहंमद गौस, माजी उपनगर अध्यक्ष करीम खान साब, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष इक्बाल कुरेशी,मौलाना अब्दुल कलाम शाळेचे संस्थापक रशीद मुलतानी, अल्पसंख्यांक काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष सय्यद तोफीक, यांच्या निवास स्थानी भेट दिली. यावेळी काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष पप्पू पाटील कोंढेकर, काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, शहरअध्यक्ष कैलास गोडसे, युवा काँग्रेस जिल्हाध्यक्ष बालाजी गाडे, माजी नगरअध्यक्ष राज बहादूर कोत्तवार,माधव हामंद, अँड संदीप देशमुख बारडकर, अतिक अहेमद, युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील मुंगल, शहरअध्यक्ष मुजीब पठाण, उपजिल्हाध्यक्ष राजू चौदंते, यासह माजी नगराध्यक्ष राम चौधरी यांच्या वतीने दरवर्षीप्रमाने याही वर्षी ईद निमित्त बुंदीचे पाकीट वाटप करण्यात आले.

यावेळी भाजपचे महामंत्री प्रविण गायकवाड, शहराध्यक्ष पप्पु सोनटक्के, माधव कदम, बहुजन समाज पार्टीचे नेते अँड कमलेश चौदंते, सुभाष चौदंते, यासह विविध पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकमेकास अलीगण देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या.

## 'स्वारातीम' विद्यापीठांतर्गत पदवी परीक्षेला आजपासून सुरुवात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०१ एप्रिल**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत परीक्षेत्रातील चारही जिल्ह्यामधील पदवी परीक्षेला आज दि.०२ एप्रिल पासून सुरुवात होत आहे. एकूण १०१ परीक्षा केंद्रावर ०१ लाख ४ हजार ६१६ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

बी. ए., बी.कॉम., बी.एस्सी. आणि आंतरविद्याशाखा यामधील एकूण ३५ अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. २ ते ३० एप्रिल दरम्यान होणार आहेत. या परीक्षा सुरळीत होण्यासाठी तथा कॉपीमुक्त होण्यासाठी विद्यापीठाकडून ५२ भरारी पथकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. याशिवाय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर सर हे पण अचानकपणे चारही जिल्ह्यातील कोणत्याही परीक्षा केंद्रास भेट देणार आहेत. या दरम्यान परीक्षा केंद्रावर कॉपी अथवा असुविधा आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे, असे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी कळविले आहे.


## मुदखेड नगर परिषद मुदखेड जि. नांदेड
### ई-निविदा सुचना (क्रं. ०२/२०२५)

जा.क्र. मुनपा/ताशा/विकास/२०२४-२५/४०५ दिनांक २८ /०३/२०२५

### पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

याव्दारे सर्व कंत्राटदारास सुचित करण्यात येते की, मुदखेड नगरपरिषद मुदखेड घनकचरा प्रकल्प येथे SBM २.० अंतर्गत स्थापत्य विषयक विकास कामे करण्याकरीता ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत. अटी शर्ती सह सविस्तर ई-निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.mahaetenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०१/०४/२०२५ दुपारी १०.३० वाजता ते दिनांक २१/०४/२०२५ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा वरील संकेतस्थळावर दिनांक २१/०४/२०२५ रोजी १७.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.


(शैलेश फडसे)
मुख्याधिकारी व प्रशासक
न.प. मुदखेड जि.नांदेड

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# दिवाणी न्यायाधीश परीक्षेत ऋचा कुलकर्णी राज्यात पहिली

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ एप्रिल**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) आणि जेएमएफसी यांनी घेतलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा २०२२ चा निकाल जाहीर झाला असून, बीडची ऋचा विठ्ठल कुलकर्णी ही राज्यात पहिली आली आहे. विशेष म्हणजे पहिल्या दहा गुणवंतांमध्ये नऊ मुलींचा समावेश आहे.



कोरोनामुळे कनिष्ठ दिवाणी न्यायाधीश व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा २०२२ ची परीक्षा लांबणीवर पडली होती. कोरोनानंतर ९ सप्टेंबर २०२३ला पूर्ण परीक्षा झाली होती. २४ ऑगस्ट २०२४ रोजी मेन (मुख्य) परीक्षा घेण्यात आली. त्यातील ३४३ उमेदवारांची मुलाखतींसाठी निवड झाली. १७ ते २९ मार्च या काळात मुलाखती पार पडल्या. शनिवारी अंतिम निकाल जाहीर झाला असून, ११४ जणांची दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पदासाठी निवड करण्यात आली आहे.

पहिल्या दहा टॉपर्समध्ये नऊ मुली

या निकालाचे वैशिष्ट्य म्हणजे पहिल्या दहा टॉपर्समध्ये नऊ मुली आहेत. बीडची ऋचा विठ्ठल कुलकर्णीने पहिल्याच प्रयत्नात मोठे यश मिळविले. ऋचा कुलकर्णी राज्यात पहिली आली आहे. सायली संपत झांबरे हिने द्वितीय तर किरण संभाजी मुळीक हिने तिसरा क्रमांक पटकावला. त्यानंतर शिवाणी रामनाथ फाडोळ, तन्वी रहेमान शेख, सोनिया अविनाश गंधले, तनुज रमेश कुसारे, सुवर्णा विनायक शास्त्री, वंदना अरविंद चामले, किरण शांताप्रसाद वर्मा, विपुल एकनाथराव गुंजाळ, अनिकेत लिंबाराव कोकरे आदींची निवड झाली आहे.

# अंबाजोगाईत दिवसाढवळ्या तरुणावर प्राणघातक हल्ला; रक्तबंबाळ अवस्थेत रुग्णालयात दाखल, उपचारादरम्यान तरुणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१ एप्रिल**

अंबाजोगाईत राजकुमार करडे नामक तरुणावर धारदार शस्त्राने सपासप वार करण्यात आले असून, उपचारादरम्यान या तरुणाचा मृत्यू झाला आहे.

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीचं सत्र अद्याप थांबलेलं दिसत नाही. बीड जिल्ह्यात चोरी, घरफोडी, मारहाण, बलात्कार, छेडछाड, लुटमारीसारख्या घटना सुरूच आहेत. अशातच अंबाजोगाईत राजकुमार साहेबराव करडे (वय ३०,रा.गवळीपुरा, अंबाजोगाई) या तरुणावर रामकृष्ण काळे चौकात धारदार शस्त्राने सपासप वार करण्यात आले असून, त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर बीड जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे. अंबाजोगाईतील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं आहे.

बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख हत्याकांड प्रकरण संपूर्ण राज्यात गाजत असताना गुन्हेगारी घटनामध्ये वाढ झाली आहे. बीडच्या अंबाजोगाईत घडलेल्या एका धक्कादायक घटनेत तरुणाचा मृत्यू झाला आहे. राजकुमार साहेबराव करडे (वय ३० वर्षे, रा. गवळीपुरा, अंबाजोगाई) असे मृत तरुणाचं नाव आहे.

पोखरी रोडवरील पिताजी सारडा नगरीजवळ मंगळवारी (१ एप्रिल २०२५) सकाळी ९ वाजताच्या सुमारास दोन अज्ञात हल्लेखोरांनी राजकुमारवर धारदार शस्त्रांनी सपासप वार केले होते. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या राजकुमार करडे यांना तातडीने स्वाराती रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हल्लेखोरांनी त्यांच्या गळ्यावर, डोक्यावर आणि पाठीवर वार केल्याने मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव झाला होता, ज्यामुळे त्यांचे प्राण वाचवता आले नाहीत, असे उपचार करण्याऱ्या डॉक्टरांच्या पथकाने सांगितले.

दरम्यान, या हल्ल्यामागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी जुन्या वादातून हा हल्ला झाला असावा अशी चर्चा सुरू आहे.. पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून, हल्लेखोरांचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे अंबाजोगाई शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# भवानी अर्बन बँकेला १४३.२३ लक्ष रुपयांचा नफा

## माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्याकडून संचालक मंडळाचे कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१ एप्रिल**

भवानी अर्बन को.ऑप.बँक लि, गेवराई या बँकेला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात करपूर्व १४३.२३ लक्ष रुपयांचा नफा झालेला आहे. बँकेने या आर्थिक वर्षात डिजिटल आर्थिक व्यवहारावर लक्ष केंद्रीत केले आहे. एटीएम सुविधेसह डेबिट कार्ड, मोबाईल बँकिंग, आयएमपीएस, युपीआय, आधार पेमेंट, नॅच (डीबीटी) आदी सुविधा बँकेच्या ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या आहेत. माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली सचोटीने पारदर्शक कारभार केल्यामुळे बँकेने ग्राहकांमध्ये विश्वासार्हता निर्माण केली आहे. बँकेला या आर्थिक वर्षात मिळालेल्या यशाबद्दल माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांनी संचालक मंडळाचे कौतुक केले आहे.

भवानी अर्बन को.ऑप.बँक लि, गेवराई या बँकेला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात करपूर्व १४३.२३ लक्ष रुपयांचा नफा झालेला आहे. बँकेचे भागभांडवल २ कोटी ७६ लक्ष आहे. बँकेचा स्वनिधी ६८६.६७ लक्ष रुपये असून मार्च २०२५ अखेर एकुण ठेवी ७० कोटी ९२ लक्ष रुपये आहेत. बँकेने ३४ कोटी ४८ लक्ष रुपयांचे कर्ज वितरण केले असून ३४ कोटी ९७ लक्ष रुपये बँकेची गुंतवणुक आहे, यापैकी २९ कोटी ७२ लक्ष रुपये सरकारी रोख्यात बँकेने गुंतविले आहेत. बँकेचे खेळते भांडवल ८३६०.०५ लक्ष रुपये आहे, बँकेचे ढोबळ अनुउत्पादीत कर्जाचे प्रमाण १.११% असून बँकेचा नेट एनपीए ०.७०% असल्याची माहिती बँकेचे चेअरमन बप्पासाहेब मोटे यांनी दिली.

चेअरमन बप्पासाहेब मोटे पुढे म्हणाले की, माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांनी गेवराई सारख्या ग्रामीण भागात एकोणिस वर्षांपूर्वी ही बँक स्थापन करून ग्रामीण भागातील लोकांना विश्वासार्ह आर्थिक व्यवहाराचे दालन खुले करून दिले. माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली भवानी अर्बन बँकेने सभासद, ग्राहक, खातेदार, कर्जदार व हितचिंतकांच्या सहकार्याने प्रगती केली आहे. बँकेचे संपुर्ण आर्थिक व्यवहार डिजिटल स्वरुपात रुपांतरीत केल्यामुळे ग्राहकांना त्याचा मोठा लाभ होत आहे. बँक ग्राहकांच्या सेवेत एटीएम, डेबिट कार्ड, मोबाईल बँकिंग प, आयएमपीएस, युपीआय, आधार पेमेंट, नॅच (डीबीटी) आदी सुविधा नव्याने सुरु केलेल्या आहेत.

बँकेला मिळालेल्या यशाबद्दल माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांनी संचालक मंडळाचे कौतुक केले. याप्रसंगी बँकेचे चेअरमन बप्पासाहेब मोटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण, बप्पासाहेब जाधव, रघुनाथ मोहोळकर, बँकेचे सरव्यवस्थापक भाऊसाहेब नागरे, बीड शाखेचे व्यवस्थापक प्रकाश आमलेकर, माजलगाव शाखेचे व्यवस्थापक मनोज डावकर यांच्यासह बँक कर्मचारी व सभासद उपस्थित होते.

# अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस मार्च २०२५ अखेर ६ कोटी ६२ लक्ष रुपयांचा करपूर्व नफा

**वर्ष अखेर ५७३ कोटींच्या ठेवी जमा करत ०% नेट एन पी ए राखण्यात बँकेस यश**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१ एप्रिल**

अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेने सन २०२४-२०२५ मधील केलेल्या उत्तम कामकाजामुळे ३१ मार्च २०२५ अखेर बँकेने ५७३ कोटींच्या ठेवी जमा करत वर्षाखेरीस ०% नेट एन पी ए राखण्यात यश मिळवले आहे. त्याबरोबरच मार्च २०२५ अखेरीस बँकेस ६ कोटी ६२ लक्ष एवढा करपूर्व नफा मिळवल्याचे बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. बँकेने मिळवलेले हे यश बँकेचे सर्व सन्माननीय संचालक, ठेवीदार, ग्राहक तसेच सभासदाच्या विश्वास व सहकार्याच्या भावणेमुळेच शक्य झाले असल्याचे देखील या पत्रकात नमूद केले आहे.

मार्च २०२५ अखेर बँकेची एकूण सभासद संख्या १२५८६ एवढी असून बँकेकडे ५७३ कोटीच्या ठेवी जमा झाल्या आहेत. त्याच्या बळावरच बँकेच्या सभासद तथा ग्राहक बांधवाना मार्च २०२५ अखेर रु.३३० कोटी इतके कर्जवाटप केले आहे. या आर्थिक वर्षाचे रु.१९ कोटी एवढे भाग भांडवल असून बँकेचा स्वनिधी रु.५० कोटी एवढा आहे. त्याचबरोबर वर्ष अखेरीस बँकेने एकूण रु. २९० कोटी एवढी गुंतवणूक केली आहे . ३१ मार्च २०२५ अखेर बँकेने एकूण ठेवी रु. ५७३ कोटी इतक्या जमा केलेल्या आहेत . गतवर्षीच्या तुलनेत तब्बल २३ कोटी रुपयांची व्यवसायात वाढ झाली आहे. बँकेस ३१मार्च २०२५ अखेर रु. ६ कोटी ६२ लक्ष इतका करपूर्व नफा मिळवला आहे. सर्व क्षेत्रातील आर्थिक परिस्थिती पाहता बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी , कर्मचारी वृंद तसेच कर्जदार , ठेवीदार व सभासद यांच्या सांघिक कामगिरीमुळे बँकेस हे प्रगतीचे उद्दीष्ट साध्य करता आले असल्याचे बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी व मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे सांगितले आहे . मार्च २०२५ अखेरील बँकेची प्रगती ही बँकेच्या पुढील वाटचालीस नवीन उभारी देणारी असून बँकेच्या सभासदांनी व ग्राहकांनी बँकेवरील विश्वास कायम ठेवल्याची पावती असल्याचे देखील मोदी यांनी नमूद केले आहे. चालु आर्थिक वर्षात अनंत अडचणी येऊनही बँकेच्या वसुली विभागाने समाधानकारक काम करत बँकेचा निव्वळ एनपीए ०% राखण्यात बँकेने यश मिळवले आहे.

देशातील आर्थिक परिस्थिती वाढती महागाई, बेरोजगारी अशा अवघड परिस्थिती देखील कर्जधारक , ग्राहकांचा विचार करुन बँकेने सुरळीत आर्थिक व्यवहार करत बँकेची आर्थिक स्थिती समाधानकारक ठेवण्यास यश मिळवले आहे असे मत बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. बँकेचे सर्व सभासद, ग्राहक यांचा विश्वास, बँकेचे संचालक मंडळ तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उत्कृष्ट नियोजन व बँकेच्या अधिकारी व कर्मचारी वृंदाचे नियोजनबध्द कामकाज यामुळे सन २०२४ - २०२५ मध्ये चांगले कामकाज करणे शक्य झाले आहे. अशीच कामगिरी पुढील आर्थिक वर्षातही कायम ठेवण्याचा बँकेचा प्रयत्न असेल अशी ग्वाही अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

१९९६ साली केवळ एका शाखेद्वारे अतिशय अल्प अशा भांडवलावर सुरू झालेली अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक आज ५७३ कोटीच्या ठेवीच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याच्या बीड, लातूर, धाराशिव, छत्रपती संभाजी नगर, पुणे अहिल्यानगर या जिल्ह्यात २० शाखांच्या माध्यमातून ग्राहकांना सेवा देत आहे. नुकतीच भारतीय रिझर्व्ह बँकेने केज, मुरुड व निलंगा या ठिकाणी बँकेच्या नवीन तीन शाखा सुरू करण्यास परवानगी दिली आहे. रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या सर्व नियमांच्या आधीन राहूनच अंबाजोगाई पिपल्स बँकेने आजपर्यंत सर्व आर्थिक व्यवहार करत आहे. या कामगिरीच्या बळावरच रिझर्व्ह बँकेने नवीन शाखा सुरू करण्यास परवानगी दिल्याचे मोदी यांनी या पत्रकात नमूद केले आहे. अंबाजोगाई पिपल्स बँक अर्थकारण करत करतच अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवित आहे. ज्यामध्ये शहरातील गुणिजनांचा सन्मान , रक्तदान शिबिर याबरोबरच महिलांसाठी बँकिंग प्रशिक्षण शिबिर, विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात बँक अग्रस्थानी असते.या व अशा इतर अनेक कारणांमुळे बँक ग्राहकांच्या प्रथम पसंतीस उतरली असल्याचे समाधान बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले आहे .यापुढेही बँकेचे सन्माननीय संचालक प्रा वसंत चव्हाण, ऍड विष्णुपंत सोळंके, अरुण काळे,पुरुषोत्तम चोकडा, सुरेश मोदी,ऍड सुधाकर कऱ्हाड, संकेत मोदी, शेख दगडुभाई शेख दावल, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा,हर्षवर्धन वाडमारे, श्रीमती वनमाला रेड्डी, सौ स्नेहा हिवरेकर, प्रा. लक्ष्मण दासूद , सचिन बेंबडे यांच्या सहकार्याने अर्थकारणासोबतच वारंवार असेच सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येतील असा संकल्प राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला.

# स्वामी समर्थ अन्नछत्र सभागृहासाठी आ.नमिता मुंदडांच्या विकास निधीतुन १० लक्ष रूपये, संसार जीवनात अध्यात्मिक अनुष्ठान महत्वाचे-नंदकिशोर मुंदडा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१ एप्रिल**

यशवंतराव चव्हाण चौकालगत असलेल्या शंकर नगर, मोरेवाडी येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात अन्नछत्र सभागृह बांधकामासाठी केज विधानसभा मतदारसंघाच्या आ.सौ. नमिता अक्षय मुंदडा यांच्या विकासनिधीतुन सुमारे १० लक्ष रूपये मिळवुन घेवु असं सांगताना संसार जीवनात अध्यात्मिक मार्गाने गेले तर खर्या अर्थाने सुख तिथे मिळते. समाजातील दात्यांच्या योगदानातुन कोणताही यज्ञ पुर्ण करता येणे शक्य असल्याचे प्रतिपादन भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी केले तर भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे ही निष्ठा श्री स्वामी समर्थावर ठेवुन मनोभाव सेवा केली तर तो भाविक भक्तांच्या पाठीमागे खंबीर उभा रहातो या शब्दांत भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले.

शंकर नगर, मोरेवाडी येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात प्रकट दिन उत्सव हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आली. सकाळी समर्थांची भव्य मिरवणुक, दुपारी महाआरती व महाप्रसाद वाटप करण्यात आला. दरम्यान याच वेळी मंदिराच्या समोर अन्नछत्रासाठी खरेदी केलेल्या जागेवर मान्यवरांच्या उपस्थितीत भुमीपुजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. सुरूवातीला व्यासपीठावरील मान्यवरांचा मंदिर कमिटीच्या वतीने सत्कार झाल्यानंतर जेष्ठ सामाजिक नेते बन्सीआण्णा सिरसाट यांनी मनोगत व्यक्त करताना या सामाजिक कार्यासाठी आपण हवे तसे सहकार्य करू जिथे धार्मिक उद्दिष्ट असते तिथे आमची सेवा मनोभावे असते असं ते म्हणाले. शंकरराव उबाळे यांनी देखील मनोगतपर भाव व्यक्त करून सहकार्य बोलुन दाखवले. राम कुलकर्णी यांनी विचार मांडताना संसार जीवनात अध्यात्मिक शक्ती खर्या अर्थाने आनंदी जीवनाचा मार्ग असुन ज्या परमेश्वरासाठी आपण निवारा करू तोच आपल्याला निवारा आयुष्यासाठी देवु शकतो.



अन्नछत्र बांधकामासाठी योगदान देण्याची संधी मिळणे खर्या अर्थाने भाग्य असुन भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी ही शक्ती दैवी चमत्कार असल्याचे त्यांनी सांगितले. जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी सभागृहासाठी आमदाराच्या वतीने पुढाकार घेताना पहिल्या टप्यात दहा लक्ष रूपये मिळवुन देवु नंतर दुसर्या टप्यात दहा लक्ष रूपये पुन्हा देवुन एक सुसज्ञ असं अन्नछत्र सभागृह बांधण्याचा संकल्प त्यांनी बोलुन दाखविला. माणुस सुखासाठी धडपडतो पण खरं सुख अध्यात्म,ज्ञान मार्गातुन मिळते जिथे दु:खाचा विसर झाल्याशिवाय रहात नाही. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंदिराचे मुख्य सेवेकरी नारायण डांगे यांनी केले. व्यासपीठावर जिल्हा परिषद सदस्य बालासाहेब शेप, श्री काजगुंडे साहेब, सरपंच औदुंबर मोरे, अविनाश मोरे, कमलाकर आण्णा कोपले, श्री करनर साहेब, वसंत आबा मोरे, रामकृष्ण पवार, नागनाथ गित्ते, मारोती मोरे, रविकिरण मोरे, रणजित मोरे, महादेव सोमवंशी, कृष्णा भैय्या लोमटे, विशाल सोनवणे, विकास लामतणे, बाला पाथरकर, व्यंकट किर्दंत, मंदार काटे, अनंतराव आरसुडे, राम जाधव, राहुल कदम, जोशी सर, कुलकर्णी काका सर्व सेवेकरी मंडळ यांची उपस्थिती होती. संचलन गणेश मामा काळे यांनी केले. या धार्मिक सोहळ्याला मोठ्या प्रमाणावर भाविक भक्त व महिलांची विशेष उपस्थिती होती.

# चैत्र गौरीचे आगमन....झाले प्रसन्न मन...


भारतीय संस्कृतीमध्ये सन समारंभाला अनन्यसाधारण महत्त्व आहे .महाराष्ट्रात चैत्र महिन्या मध्ये शुक्ल पक्षात चैत्र शुक्ल तृतीयेपासून चैत्रगौर बसवली जाते. हा एक धार्मिक आणि पारंपारिक सोहळा वैशाख शुक्ल तृतीया अर्थात अक्षय तृतीयेपर्यंत साजरा केला जातो. शिवपत्नी पार्वती ही गौरी (सरस्वती) रूपात पूजली जाते ही पितळेच्या किंवा लाकडाच्या पाळण्यात बसलेली गौर या चैत्र महिन्यामध्ये आपल्या माहेरी येते अशी अख्यायिका आहे चैत्र शुक्ल तृतीयेला या पितळेच्या किंवा लाकडी पाळण्यातल्या गौरीला सुगंधी तेल ,अत्तर लावून कोमट पाण्याने स्नान घातले जाते. त्यानंतर नवीन वस्त्र, अलंकार, वस्त्रमाळा,गाठी हार, पुष्पहार घालून सालंकृत पूजा केली जाते .खन नारळ ओटी भरून, फळं, खीर, कानोला मुरमुरे, बत्तासे,भिजवलेले हरभरे किंवा हरभरा डाळ टरबूज, पानसुपारी इत्यादीचा नैवेद्य दाखवून आरती केली जाते .संपूर्ण चैत्र महिना मनोभावे पुष्प अर्पण करून या चैत्रगौरीला पुजले जाते दुसऱ्या तीजला म्हणजेच तृतीयेला परत एकदा स्नान घालून, सालंकृत पूजा करून आपल्या सोयीप्रमाणे महिन्यातील एक दिवस सर्व फराळाचे पंच पकवांना जसे करंजी, लाडू ,अनारसे ,चकली शेव, इत्यादी करून सुवासिनी आणि कुमारिकांना हळदीकुंकवासाठी बोलावले जाते .त्यामध्ये गौरीला सजवून, अलंकृत करून शोभिवंत आरास मांडून, कैरी घालून वाटलेली हरभरा डाळ ,कैरीचे पणहे मुरमुरे, हाताला चंदनाचा लेप, सुगंधी अत्तर लावून सुवासिनींना आणि कुमारीकांना हळदीकुंकू, विड्याच्या पानाचे तांबूल दिले जाते. बऱ्याच ठिकाणी चैत्रगौरी पुढे किंवा घराच्या अंगणात चैत्रांगण काढले जाते म्हणजेच हिंदू संस्कृतीची प्रतीके रंगीत रांगोळीने रेखाटली जातात त्यालाच चैत्रंग असे म्हणतात. त्यामध्ये देवीची शस्त्रे जसे शंख, चक्र, गदा ,पद्म आणि तिची वाहने म्हणजे गाय, हत्ती, कासव, नाग, गरुड त्याचबरोबर देवीची सौभाग्याची लेणी म्हणजे फनी, करंडा, आरसा ,मंगळसूत्र, सुवासिनींच्या ओटीचे ताट त्याचबरोबर स्वस्तिक, ओमकार , तुळशी वृंदावन,आंबा, श्रीफळ, उंबर, पिंपळ वगैरे पूज्यवृक्ष, चैत्रगौरीचा पाळणा, गणपती समई ,कमळ, कासव, सूर्य, चंद्र , त्रिशूल इत्यादी आकृत्या रंगीत रांगोळीने रेखाटून हिंदू संस्कृतीचे प्रतीके दाखवली जातात .सर्व कौतुक होत असताना अखेर अक्षय तृतीयेच्या दिवशी गौर पुन्हा सासरी जायला निघते तेव्हा तिला खीर कानोला, दहीभात, आंब्याचा रस असा नैवेद्य दाखवला जातो



सण समारंभ आणि विज्ञानाची सांगड घालून बारकाईने विचार केला तर त्यामागे एक प्रकारे आरोग्य समृद्धी ,प्रेमभावना, एकी दृढ करण्याचा प्रयत्न आणि त्यामधून मनाची प्रसन्नता दिसून येते.

जसे पहा कैरीचे पन्हे... कच्च्या आंब्यापासून बनवलेले हे पन्हे शरीरातील उष्णतेचा दाह कमी करते ,शरीरातील पीएच संतुलन ठेवते म्हणजेच आम्लपित्त संतुलित करते, त्यामध्ये जीवनसत्व -अ असल्याकारणाने डोळे निरोगी ठेवते ,चैतन्य वाढवते, त्याचबरोबर अँटिऑक्सिडंट गुणधर्मामुळे कर्करोगाचा धोका टाळण्यास मदत होते , गुणधर्मामुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या रोखण्यास ,वृद्धत्व मंदावण्यास मदत करते .त्यामध्ये कोलेस्ट्रॉल नसल्यामुळे अतिरिक्त वजन वाढीपासून वाचवते, पोटॅशियम भरपूर प्रमाणात असल्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी करते, त्याचबरोबर फायटोकेमिकल्स चरबीवर परिणामकारक ठरते.

त्यानंतर हरभरा... किंवा त्याची भिजवलेली डाळ ही जीवनसत्वे आणि खनिजे यांचा उत्तम स्त्रोत आहे त्यामध्ये असलेले मॅग्नेशियम ,पोटॅशियम झिंक, सेलेनियम, मॅग्नीज ,कॉपर आणि जीवनसत्व बी हे आरोग्यासाठी अतिशय पोषक. त्याचबरोबर तणाव आणि चिंता या सारख्या समस्यांपासून दूर ठेवते, हाडे मजबूत होणे, रक्तदाब नियंत्रित ठेवणे, त्याचबरोबर त्यामधील लोह असल्याकारणाने एचबी चे प्रमाण नियंत्रित राहते, फॉस्फरस असल्यामुळे शरीरातील आळस थकवा दूर होतो ,फायबरचे प्रमाण



जास्त असल्याने बद्धकोष्ठता दूर होते, प्रथिनेचे प्रमाण भरपूर असल्यामुळे मुलांच्या वाढीस मदत करते, रोगप्रतिकारक शक्ती वाढवते, संसर्गाचा धोका कमी होऊन शरीर निरोगी राहण्यास मदत होते.

मुरमुरे... तांदळाच्या लाह्यांपासून तयार झाल्यामुळे आणि फायबरचे प्रमाण जास्त असल्यामुळे पचायला सोपे बद्धकोष्ठतेचा त्रास दूर ,हाडे मजबूत होणे ,ऊर्जा वाढणे, वजन नियंत्रित ठेवणे, त्वचेच्या समस्यांना दूर ठेवणे ,भरपूर प्रमाणात खनिजे आणि जीवनसत्वे असल्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढणे इत्यादी मदत होते .

टरबूज.. जीवनसत्वे ,खनिजे असल्यामुळे उन्हाळ्यामध्ये अतिशय गुणकारी असे हे फळ ताणतणाव दूर ठेवणे, डोके शांत ठेवणे, पाण्याची पातळी नियंत्रित ठेवणे,रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे इत्यादी

विड्याचे पान.. नागवेलीच्या पानाचे तांबूल प्रमाणात सेवन केल्यास पाचक्ररसासह पोषक द्रव्य शोषण्यास मदत करते,अनेक आजारांवर जसे पित्त, अपचन ,पोट साफ न होणे, सर्दी खोकला, तोंड येणे, गुडघेदुखी, टाच दुखी, साखरेची पातळी नियंत्रित ठेवणे, मुखदुर्गंधी दूर ठेवते अशा अनेक आजारावर रामबाण उपाय/उपयुक्त ठरते..अशाप्रकारे तीव्र उणाला सामोरे जाण्यासाठी आणि जीवनात आनंद मिसळण्यासाठी सन समारंभ वैज्ञानिक दृष्टीने पाहता उपयुक्त ठरते.

**चैत्रगौरी संपदा घेऊनी आली सदनी**
**आरोग्य संपन्न आनंद दाटला मनी...**

**अश्विनी वासुदेवराव टेकाळे (जोशी)**
**चंपावती माध्यमिक विद्यालय, बीड.**